2018-19


Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April -2019

SPECIAL ISSUE-

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, चर्चा व चिंतन




Executive Editor:
Prof. Virag Gawande
Director,
Aegeus Social Research & Development Training Institute Amravati

Guest Editor
Dr. Dipak S. Raut
Principal
Samarth Kala Mahavidyalaya Dahihanda, Dist-Akola [M.S.]

Chief Editor
Mr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College, Yeola, Dist- Nashik [M.S.] INDIA


RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in:
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

Research papers in UGC listed Journals, Journals and conferences. 2018-19

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705

I SSN : 2348-7143
April 2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | प्रा. दीपक स. वानखडे | 9 |
| 2 | बहुजन समाजातील बदल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. राहुल मधुकर रोडे | 12 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आर्थिक कार्य | कविता हिरुळकर | 15 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षीत असलेली लोकशाही | डॉ. संतोष बाबुराव कुन्हे | 19 |
| 5 | ललमनियाँ कहानियाँ में व्यक्त स्त्री व्यथा | प्रा.डॉ.पवन एमेकर | 24 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्री-मुक्ती चळवळ | कु. वैशाली श्रीकृष्ण हिवराळे | 27 |
| 7 | स्त्रीयांच्या सक्षमीकरणाबाबत डॉ. आंबेडकराचे विचार व कार्य. | डॉ. निलेश क. देशमुख | 30 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाकल्याणासंबंधी विचार | डॉ. अर्चना देविलाल भैसारे | 33 |
| 9 | डॉ. आंबेडकरांचे कृषी विषयक विचार एक अवलोकन | प्रा. डॉ. संजय काळे | 36 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | डॉ. जगन्नाथ नारायण ढाकणे | 40 |
| 11 | डॉ. आंबेडकरांचे कामगारविषयक विचार आणि संघर्ष | डॉ. प्रा. जयश्री देशमुख | 44 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज सुधारणा कर्तृत्व | डॉ. सी. डी. पाखरे | 47 |
| 13 | डॉ. आंबेडकर आणि घटनेतील स्वातंत्र्याचा अधिकार | प्रा. प्रविण जयकृष्ण गुल्हाने | 50 |
| 14 | डॉ. बाबासाहेब अम्बेडकर तथा उनके राजनितिक कार्य | प्रा. डॉ. वाय. डी. मेश्राम | 52 |
| 15 | डॉ.बी.आर.आंबेडकरांचा अर्थविचार : एक सार्थ चिंतन | डॉ. भगवान ए. इंगळे | 55 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही | प्रा. दिवाकर सदांशिव | 58 |
| 17 | भारतीय समाज व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | प्रा. डॉ. राजु प्र. गवई | 61 |
| 18 | भारतीय लोकशाही, संविधान आणि वर्तमान | प्रा.डॉ. नितीन दादाराव गोरखेडे | 65 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | प्रा.डॉ.सौ.शुभांगी डोरले—परांजपे | 67 |
| 20 | काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह : १९३० | डॉ. धर्मेंद्र तेलगोटे | 69 |
| | | | |




Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
April 2019

# काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह : १९३०

डॉ. धर्मेंद्र तेलगोटे,
प्राचार्य, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय,पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ

**सारांश :**

हिंदू समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील फार महत्वाचा सत्याग्रह म्हणून काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह मानला जातो. या सत्याग्रहाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. हजारो अस्पृश्य या सत्याग्रहात सामील झाले. तथापि मंदिरात प्रवेश करण्याबाबत्यांचा मार्ग सुकर झाला नाही. मंदिर प्रवेशामुळे कोणताही लाभ अस्पृश्यांना होणार नाही याची स्पष्ट जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. तथापि व्यक्तीस व्यक्ती म्हणून समाजाने मानावे यासाठी तो लढा होता. या लढ्याला शासन व निरनिराळ्या समाज घटकांचे सहकार्य मिळाले नाही पण या लढ्यामुळे अस्पृश्यांमध्ये अस्मितेची भावना जागृत झाली.

**प्रस्तावना:-**

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवित कार्याची सुरूवात महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाने केली. त्यानंतर 1930 मध्ये त्यांच्या नेतृत्वात नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू झाला. हा सत्याग्रह 1930 ते 1935 असा चालला. शांततापूर्ण व सनदशिर मार्गाने हा सत्याग्रह सुरु होता. मंदिर प्रवेशामुळे मुक्ती मिळेल किंवा इतर फार मोठे लाभ होतील असे नाही. पण त्यामुळे समतेचे तत्व व मूल्य प्रस्थापित होईल, असा डॉ. आंबेडकरांचा विश्वास हाता. प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहापुरतीच सिमीत आहे.

**मंदिर प्रवेश सत्याग्रह :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली काळाराम मंदिर प्रवेशासाठी नाशिक येथे 3 मार्च 1930 रोजी सत्याग्रह सुरू झाला तो 1934–35 पर्यंत चालला. ऑक्टोबर 1929 मध्ये डॉ. आंबेडकरांना नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशासाठी करावयाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व करावयाची विनंती नाशिक येथील कार्यकर्त्यांनी केली. बाबासाहेबांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व करावयाचे मान्य केले. या सत्याग्रहासाठी एक सत्याग्रह समिती गठीत करण्यात आली. नाशिक जिल्हा महार संघ स्थापन करण्यात आला. आपल्यास मंदिरात प्रवेश न दिल्यास आपण सत्याग्रह करू अशी पूर्वसूचना लेखी स्वरूपात मंदिर व्यवस्थापकांना देण्यात आली.

3 मार्च 1930 रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात 300 सत्याग्रहींचा जत्था काळाराम मंदिराजवळ शिस्तबध्दरितीने चालत आला. या सत्याग्रहींमध्ये भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, पतीत पावन दास, शंकरबुवा इ. प्रमुख व्यक्ती होत्या. काळाराम मंदिराची प्रवेशव्दारे बंद होती. महारांना मंदिरात प्रवेश करण्याचा हक्क नाही, असे मंदिराचे पुजारी व त्यांच्याशी संबंधित लोक सांगत होते.

काळाराम मंदिरास चारही दिशांना चार दरवाजे होते. या चारही दरवाज्यांच्या समोर सत्याग्रही ठाण मांडून बसले. 7 एप्रिल 1930 रोजी रामनवमी होती. रामनवमीच्या दिवशी निघणाऱ्या रथासोबत सवर्णासोबत अस्पृश्यांना सहभागी करून घेण्याची परंपरा होती. पण त्या दिवशी सवर्णांनी वेळेच्या आधिच रथ वाहून नेण्यास सुरुवात केली. रथाच्या मागे अस्पृश्य मंडळी धावू लागली. तेव्हा त्यांच्यावर सवर्णांनी दगडांचा वर्षाव केला. दोन्ही बाजुने दगडाचा वर्षाव सुरु झाला. त्यामुळे दोन्ही बाजुचे अनेक लोक जखमी झाले. त्यानंतर सरकारने मंदिर परिसरात 144 कलम लागू केले. त्यामुळे पाच पेक्षा कमी संख्येचे सत्याग्रहींचे गट करण्यात आले. या तुकड्यांनी मंदिराभोवती फिरत्या पाळणे सुरु केले. मुंबई सरकारच्या विनंतीवरून सत्याग्रहास बाबासाहेबांनी काही काळ स्थगिती दिली. 28 एप्रिल 1930 रोजी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
April 2019

पुन्हा सत्याग्रह सुरू झाला. त्यावेळी दलितांवर सवर्णांकडून दगडांचा वारवा मारा करण्यात आला. 25 मे 1930 रोजी काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह थांबविण्यात आला. त्यानंतर 15 मार्च 1931 पासून सत्याग्रह सुरू करण्यात आला. तो ऑक्टोबर 1935 पर्यंत चालला. या काळात सनातन्यांनी अस्पृश्यांचे मंदिर प्रवेशाचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. अनेक लोक जखमी, जायबंदी झाले.

**सत्याग्रह विश्लेषण :-**

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाने काय साधले? याचा विचार करताना बाबासाहेबांचा या मागचा व्यापक दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे. काळाराम मंदिर सत्याग्रह 1930 ला सुरू झाला. त्यापूर्वी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला होता. या सत्याग्रहातील आंबेडकरांची भूमिका ही होती की, अस्पृश्य हे हिंदू धर्मातील उच्च वर्णीय अस्पृश्यांना माणूसकीचे साधे हक्क देण्यास तयार आहेत अथवा नाहीत ते आंबेडकरांना तपासायचे होते. कुत्र्या, मांजरांना अतिशय किंमत देणारा हिंदू समाज त्यांच्याच अस्पृश्य बांधवांना कशी वागणूक देतो या प्रश्नाचे उत्तर काळाराम मंदिर प्रवेशाच्या माध्यमातून आंबेडकर शोधू पाहत होते.

दगडाच्या देवाचे दर्शन घेतल्याने मनुष्याचे मूलभूत प्रश्न निश्चित सुटणार नाहीत. पण त्याच्या दर्शनाची संधी प्राप्त करून घेणे म्हणजे हिंदूंच्या मनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करणे होय. आंबेडकरांना मंदिर प्रवेश चळवळीतून सवर्ण हिंदूकडून जे अपेक्षित होते ते काहीच घडले नाही. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते (काही) चळवळीच्या बाजुने होते. मंदिर प्रवेशास पाठिंबा द्यावा अशी विनंती भाऊराव गायकवाड यांनी महात्मा गांधींना केली. पण मंदिर प्रवेशाचा प्रश्न हाती घेण्याची ही योग्य वेळ नाही, असे उत्तर गांधींनी पाठविले. (फडके, य.दि., पृ. 53)

या मंदिर प्रवेशाच्या निमित्ताने आंबेडकर स्पृश्यांना अस्पृश्य हे तुमचेच बंधु आहेत. त्यांच्याशी समानतेच्या नात्याने वागा. त्याना आपल्या व्यापक हिंदू धर्मातच राहू द्या. अशी आर्त हाक देत होते. पण नाशिकमध्ये सत्याग्रहींना मंदिर प्रवेशास सनातन्यांनी मज्जाव तर केलाच पण त्यांच्यावर दगडफेक करून आपल्या अमानवतेचे दर्शन घडविले. अस्पृश्य हळूहळू स्पृश्यांपासून दूर होऊ लागले. तसेच काँग्रेसपासून दूर होवू लागले. काँग्रेसला राजकीय सुधारणा या सामाजिक सुधारणांपेक्षा अधिक महत्वाच्या वाटतात अशी अस्पृश्यांची खात्री झाली.

मंदिर प्रवेशाच्या चळवळीमुळे आपल्या हक्कांसाठी आपल्याला एकट्यालाच लढावयाचे आहे. याची जाणिव अस्पृश्यांना झाली. हक्कासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी लागते. त्याशिवाय हक्क मिळत नाहीत, अशी जागृती त्यांच्यात झाली. काळाराम मंदिर सत्याग्रहात अस्पृश्यांची, सनातन्यांची व सुधारकांची भूमिका पाहून अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी या समाजावर किती विसंबून राहावे, असा प्रश्न डॉ. आंबेडकरांच्या मनात निर्माण झाला.

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह जेव्हा स्थगित करण्यात आला, त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी आपले सहकारी भाऊराव गायकवाड यांना पत्र पाठविले. त्यात ते म्हणतात, "या प्रश्नावर आता सत्याग्रहाची भूमिका पसंत नाही. त्याची आता आवश्यकताही नाही. ते आंदोलन आता तहकूब करावे, एवढेच नव्हे तर सत्याग्रहाचा विचारच या प्रश्नांवर सर्वस्वी रद्द करावा.. अस्पृश्यांना आपण हक्काबद्दल जागृत करणे व त्यांच्यात जोम निर्माण करणे हाच सत्याग्रह सुरू करण्यामागचा हेतू होता. यापुढे मला मंदिर प्रवेशाचा उपयोग नाही. त्यामुळे दलित वर्गाने राजकीय व शैक्षणिक प्रश्नांवर आपली शक्ती पणाला लावावी." आंबेडकरांच्या या पत्रानंतर ऑक्टोबर 1935 मध्ये मंदिर प्रवेशासाठी एकंदर सहा वर्ष चालेली चळवळ समाप्त करण्यात आली.

**समारोपीय निष्कर्ष :-**

समतेच्या आधारावर भारतीय समाज उभा राहावा. प्रत्येक व्यक्तीस व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा मिळावी यासाठी आंबेडकरांनी सत्याग्रहाचे जे लढे उभारले त्यातील काळाराम मंदिर सत्याग्रह अतिशय महत्वाचा सत्याग्रह होता. महाडच्या सत्याग्रहाप्रमाणेच हा सत्याग्रहाचे स्वरूप होते. राष्ट्रीय स्वरूपाचा एकसंघ हिंदू

[illegible]

संदर्भ :-

1. [illegible]
2. [illegible]
3. [illegible]
4. [illegible]

Impact Factor - 6.261 | Special Issue - 180 | April 2019 | ISSN - 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# SOCIAL AND SCIENCE INNOVATION

- EXECUTIVE EDITOR OF THE ISSUE -
Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

2018-19

Impact Factor 6.261 • Special Issue - 180 • April 2019 • ISSN 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal
Multidisciplinary International E-research Journal

# SOCIAL AND SCIENCE INNOVATION

... Executive Editor of this Issue ...
**Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...
**Dr. Dhanraj T. Dhangar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

21. **Isolation, Characterizations, Identification of Bacteriocin Producing Lactic Acid Bacteria (LAB) and its Biopreservative Potential** ........ 60
Sheriate Rubina A.Sattar

22. **Medicinal Property of Ayurvedic Herbs** ........ 63
Dr.Pradnya B.Gurde (Jamdhade), Dr. Subhash B. Jamdhade

23. **Preliminary Phytochemical Analysis of Cajanus cajan (Red gram) and Glycine max (Soybean)** ........ 66
Tiple Neha Ramesh[1] and Dr. Dakhane Vimal P[2]

24. **Analysis of Soluble Protein and Free Amino Acid Content of Leaf Extracts (LE) and Leaf Protein Concentrates (LPC) of Green Foliages of Some Plants.** ........ 68
V. G. Manwatkar

25. **Bioremediation of Textile Dye Amond H5g By Escherichia Sp. Abg-4.** ........ 71
Amarja Harishchandra Bhosale

26. **Morphological diversity and proximate analysis of the different variants of the Lagenaria siceraria (Mol.) Standl from Amravati region.** ........ 75
Swati Dadarao Yeotkar

27. **Phytoremediation of Heavy Metal Ions and Contaminants Through *Brassica Napus* Var. *Excel* Species** ........ 79
N. S. Shirbhate

28. **A Study of Real-time Facial Detection, Recognition and Tracking System using Raspberry Pi 3B** ........ 84
Nguyen Anh Tung
Sam Vu Thang

29. **Literature Review of recent Innovation in Garbhasanskara through Ayurveda** ........ 90
Vd. Priti Ghansham Makade

मराठी

३०. भारतीय संविधान आणि महिलांचे हक्क ........ ९२
डॉ. रमेश राठोड

३१. ~~[illegible]~~ ........ ९४
प्रा. लक्ष्मण एच. शिराळे

३२. खरीप पिकांच्या उत्पादनावर घटत्या पर्जन्याचा परिणाम–यवतमाळ जिल्हा ........ ९६
बळवंत प्रताप राठोड

३३. धर्मांतरित बौद्धांचा आर्थिक विकासाच्या संदर्भात सरकारची भूमिका ........ ९८
प्रा. किशोर जगनाथ शेंडे

३४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य ........ ९९
प्रा. डॉ. निलेश एकनाथराव तेंडे

३५. बोली भूगोल : संकल्पना व स्वरूप ........ १०२
प्रा. मोहन बापूराव चव्हाण

३६. आदर्श समाजसेविका रमाबाई रानडे–एक दृष्टीक्षेप ........ १०५
प्रा. डॉ. ज्योति दयाराम हेडवे

३७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि भारतीय अर्थव्यवस्था ........ १०८
प्रा. रमेश तानाजी सुकाळे

३८. जीवनमूल्याधिष्ठित नायिका पार्वती (महाकवी कालिदासाच्या कुमारसंभव महाकाव्याच्या संदर्भात) ........ ११२
डॉ. कर्वे पद्मजी विजय

३९. पक्षी पाणपोई : जैवविविधता संवर्धन ........ ११५
डॉ. धर्मेंद्र तेलगोटे

४०. महाराष्ट्रातील आदिवासी नाना जमातीचे स्वरूप व वैशिष्ट्ये ........ ११९
एम. के. नवाळे

४१. वाङ्मय निर्मिती प्रक्रिया ........ १२२
प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाकरे

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143 | April 2019
*Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 188 : Social and Science Innovation*

# पक्षी पाणपोई : जैवविविधता संवर्धन

**डॉ. धर्मेंद्र तेलगोटे**
प्राचार्य
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ-४४५३०५.

**सारांश :**

भारतीय जैवविविधतेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. या ऱ्हासाची गती २० व्या शतकाच्या अंतिम दशकात व एकविसाव्या शतकामध्ये सर्वात जास्त आहे. वन्यजीवांच्या अनेक जाती नष्ट होत आहेत. जैवविविधतेचे मूलस्थानी संवर्धन व परस्थानी संवर्धन अशा दोन पध्दतीने संवर्धन केले जाते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मूलस्थानी संवर्धनाचा विचार करताना नैसर्गिक व कृत्रिम पध्दती अशा दोन्ही दृष्टींचा विचार केला आहे. पक्षी प्रजाती झपाट्याने नष्ट होत आहे. कमी पडणारा पाऊस, नैसर्गिक जलसाठ्यांवरील मानवी आक्रमणे, बेसुमार जंगलतोड यामुळे हे घडते आहे. कृत्रिम पध्दतीने पक्षांसाठी संशोधनकर्त्याने पक्षी पाणपोई लावली आहे. या पाणपोईवर मार्च २०१८ ते मे २०१८ या कालखंडात सकाळ/सायंकाळ येणाऱ्या पक्षांच्या प्रजातीची संख्या १९ आहे. पक्षी संवर्धनाचा विचार वैयक्तिक व सामुहिक पातळीवर त्यामुळे रूजला आहे.

जगातील व भारतातील जैवविविधता नष्ट होण्याची गती फार मोठी आहे. सिग्मन गॅब्रियल या जर्मन पर्यावरण मंत्र्याच्या मते (२०१७) निसर्गातील ३० टक्के प्रजाती सन २०५० पर्यंत लयास जातील. त्यापैकी १/८ या वनस्पती प्रजाती असतील. शास्त्रज्ञांच्या मते प्रजाती नष्ट होण्याचा हा वेग मानवी इतिहासाचे जे टप्पे आहेत त्या टप्प्यांपैकी आजच्या टप्प्यात (२० वे शतक शेवट व २१ वे शतक प्रारंभ) सर्वात जास्त आहे. वर्ल्ड वाईल्ड लाईफ फंडच्या २०१६ च्या अभ्यासानुसार ५८ टक्के जैवविविधता १९७० नंतर नष्ट झाली आहे. जैवविविधतेच्या नाशामुळे भविष्यात मानवी जातीसमोर फार मोठे संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे जैवविविधता संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे. जैवविविधता संवर्धन मूलस्थानी संवर्धन (In-Situ Conservation) व परस्थानी संवर्धन (Ex-situ Conservation) या दोन प्रकारे केले जाते. मूलस्थानी संवर्धन पध्दतीत वन्यजीव ज्या अधिवासात राहतात. त्या अधिवासात त्यांना नैसर्गिकरित्या जपले जाते आणि त्यांचे संरक्षण व संवर्धन केले जाते. या पध्दतीत अनेक वन्यजीवांना नैसर्गिकपणे जंगलात वाढू दिले जाते. दुसऱ्या प्रकारास परस्थानी संवर्धन म्हणतात. या पध्दतीत सजिवांना त्यांच्या मूळ अधिवासापासून दूर करून नव्याने निर्माण केलेल्या अधिवासात सोडले जाते. त्यासाठी उद्यान, प्राणी संग्रहालये, बागा, जीन बँका इ. ची उभारणी केली जाते.

प्रस्तुत संशोधन निबंध मूलस्थानी संरक्षणाशी संबंधित आहे. या संशोधन निबंधाचे शिर्षक 'पक्षी पाणपोई- जैवविविधता संवर्धन' असे आहे. यात पक्षी पाणपोईच्या सहायाने मूलस्थानी संवर्धनाचा विचार करण्यात आला आहे. या संवर्धनातील पक्षी या घटकांसाठी निसर्गात/परिसरात वृक्ष लावणे विशेषतः फळधारी वृक्ष लावणे आणि पक्षी पाणपाई लावणे असे दोन घटक आहेत. एकाच वेळी कृत्रिम पध्दत व नैसर्गिकपध्दत वापरने, नैसर्गिक पध्दतीच्या प्रकारात जसजशी वाढ होईल तसतशी कृत्रिम पध्दती हळूहळू आणि शेवटी पूर्णतः थांबविणे अशा पध्दतीचा विचार करण्यात आला आहे. या संवर्धन पध्दतीच्या साहयाने निसर्गातील पक्षी प्रजातींना वाचविण्यासाठी किंवा त्याचे संवर्धन करण्याचा प्रयत्न आहे.

उन्हाळ्यात पक्षांसाठी कृत्रिम पध्दतीने पक्षी पाणपोई (Bird Waterpot) लावणे आणि त्यावर येणाऱ्या पक्षांच्या नोंदी ठेवणे, पक्षी संवर्धनाच्या या कृत्रिम पध्दतीस जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविणे आणि पर्यावरणायविषयक जाणीव जागृती त्यांच्यात निर्माण करणे हा प्रस्तुत संशोधन निबंधाचा उद्देश आहे. या पध्दतीत पक्षांसाठी जलपात्र (Bird Waterpot) पाणी टाकणाऱ्या नियमित व्यक्ती किंवा व्यक्ती समुहाची निवड करण्यात आली.

**संशोधन क्षेत्र :**

**प्रस्तुत प्रकल्पाचे संशोधन क्षेत्र महाराष्ट्र** राज्यातल्या यवतमाळ **जिल्ह्यातील आहे. पांढरकवडा-पारवा मार्गावर असलेल्या** जांबच्या जंगलव्याप्त प्रदेशात असलेल्या हनुमान मंदिराजवळ सन २००२ पासून पक्षी पाणपोई लावली जाते. प्रस्तुत संशोधन निबंधासाठी जांब येथील जंगलातील पाणपोईचा विचार करण्यात आला आहे. या पाणपोईचे अक्षांश (१९.९८७८६१) व रेखांश (७८.४२०१५३) असे आहेत.

ती आजपर्यंत अस्तित्वात (२०१९) आहे. तेच स्थळ प्रस्तुत लेखाचे निरिक्षण स्थळ व क्षेत्र आहे.

**पक्षी पाणपोई :**




पक्षांसाठी असणाऱ्या पाणपोई तयार करण्यासाठी एक टायर (स्कूटर किंवा कारच्या), तार, पाणपोई पात्र इ. गोष्टी लागतात.



Printed by : PRASHANT PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
April 2019
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 180 : Social and Science Innovation


पाणपोई पात्र म्हणजे मातीचे भांडे किंवा आपल्या घरातील मातीचा माठ कापून त्याचा घमेल्यासारखा आकार बनविल्यास त्याचे पाणपोई पात्र बनविता येते. इथे स्वतंत्रपणे पाणपोई पात्र मातीचे बनविण्यात आले आहे. छोट्या घमेल्यासारखे दिसणारे किमान ३ ते ५ लिटर पाणी मावेल, गुळगुळीत काठ असलेले हे पात्र तयार करून घेतले. टायरवर पात्र ठेवले जाते आणि टायर तारांच्या मदतीने बांधला जातो. टायरच्या दर्शनी भागावर 'पक्षी पाणपोई' असे लिहिले जाते. पात्राच्या खालच्या बाजूस टायरला तार बांधात ते तीनही तार एकत्र करून झाडाच्या मजबूत फांदीस बांधतात. जेव्हा पक्षी पाणपोई लटकविली जाते तेव्हा ती शिक्यासारखी दिसते. ज्या ठिकाणी पाणपोईत पाणी टाकण्याची खात्री कोणीतरी घेतो किंवा अशी खात्री पटते, त्या ठिकाणी ती या प्रकल्पात लावली जाते. छायाचित्रात ती दिसत आहे.

कालावधी :

पाणपोई लावावयाच्या कालावधी मार्च ते मे असा आहे. कारण या काळात नैसर्गिक जलसाठे कमी होण्यास सुरूवात होते. एप्रिल महिन्याच्या प्रारंभी जवळजवळ ते आटतात. या काळातील एखाद्या विशिष्ट दिवशी शिवरात्री, हनुमान जयंती, रामनवमी किंवा गुढी पाडवा या दिवशी ती लावली जाते. प्रस्तुत पाणपोई २०१२ मध्ये (महाशिवरात्री २०१२, मार्च महिन्यात पहिल्या आठवड्यात) लावली गेली आहे. तिच्यात मार्च ते जून महिना अखंड असे पाणी टाकले जाते. प्रारंभीच्या वर्षात संशोधक स्वतः या पाणपोईत पाणी टाकत होता. पण नंतर हळूहळू जेव्हा या पाणपोईचा प्रचार झाला तसे आता इथे येणारे बहुतेक सर्वजन त्यात पाणी घालतात. हापसीजवळ एक भांडे ठेवण्यात येते, त्याच्या मदतीने लोक पाणी घालतात. पाणपोई जेव्हा इथे लावली जाते, त्यासाठी महाशिवरात्रीचा दिवस इथे निवडला जातो. संशोधक त्याच्या काही कार्यकर्त्यांसह तिथे येतो. तिथे जमलेल्या आसपासच गावातील लोकांच्या साक्षीने जलपात्रात पाणी टाकून त्याचे उद्घाटन केले जाते.

स्थानिक वृत्तपत्रे, फेसबूक, व्हाटसअॅपच्या ग्रुपवर, पाणपोईचे फोटो अपलोड केल्या जातात. लोकांना 'पक्षांसाठी पाणपोई लावा', 'पाणपोई लावा-पक्षी वाचवा' असे संदेश देऊन आवाहन केले जाते.

निरीक्षण काळ व पद्धती :




प्रस्तुत निबंधासाठी मार्च ते मे या महिन्यात पक्षी पाणपोईवर कोणते पक्षी येतात, ते किती वेळ घालवतात, त्यांची संख्या, त्यांचा येण्याच्या वेळा व प्रजाती यांच्या नोंदी संशोधकाने ठेवल्या आहेत. मार्च २०१८ ते मे २०१८ च्या तीन महिन्यातील प्रत्येक रविवारच्या नोंदी घेतल्या आहेत. या तीन महिन्यात १३ रविवार होते. प्रत्येक रविवारी स. ६.३० ते ९.३० व सायं. ४.३० ते ६.३० असा ०५ तासांच्या नोंदी घेतल्या आहेत. १ मार्च ते ३१ मे २०१८ या काळात ६५ तास संशोधक पाणपाईजवळच्या मंदिरात आडोशाला नोंदीसाठी बसला आहे. छायाचित्रामध्ये पाणपोईवर बसणारे पक्षी दिसत आहेत.

ही नोंद किंवा निरीक्षणे साध्या डोळ्यांनी, बायनाक्युलर (Nikon A2, 10x50) कॅमेरा (Canon EOS 1500 D, Digital SLR) आणि व्हिडीओ कॅमेरा (Sony – 9.2 MPHD) यांच्या सहाय्याने घेतल्या आहेत. या नोंदी पुस्तकांच्या (The Books of Indian Bird – by Salim Ali, 2002, BNHS, OXFOD Press) पक्षी जगत ले. सचिन मेन, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर – २०१६) सहाय्याने नोंदवहीत नोंदविल्या आहेत. संशोधन लेखात पक्षी पाणपोईची छायाचित्र दिली आहेत.

या नोंदी खाली दिलेल्या तक्त्यात नोंदविल्या आहेत.

तक्ता क्र. १ : पक्षी पाणपोईस भेट देणारे पक्षी.

| अ. क्र. | पक्ष्यांचे मराठी/इंग्रजी नाव | संख्या | भेट दिलेली वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | शिंपी, Common Tailorbird(Orthotomus sutorius) | ०२ | प्रत्येक दिवशी सतत ये-जा |
| ०२ | दयाळ, Oriental Magpie Robin (Copsychus Saularies) | प्रत्येक वेळी २ च्या संख्येने नर, मादी २ जोड्या, ४ पक्षी | एप्रिल व मे महिन्यात सतत ये-जा जास्त वेळ पाणपोईवर थांबणे |
| ३ | लालबुड्या बुलबुल, Red Vented Bulbul (Pycnonotus Cafer) | २, ४, ६ च्या समुहाने | सतत ये-जा, मे महिन्यात जास्त संख्या |
| ४ | ठिपकेवाला कवडा, Spotted Dove (Streptopelia Chinensis) | ४, ६ च्या संख्येत | दररोज सकाळ-सायंकाळ. |
| ५ | पांढऱ्या छातीचा धीवर, (White – breasted Kingfisher (Halcyon Smyrnensis) | केवळ एक – दोन | दररोज सकाळी प्रथम भेट देणार एप्रिल/मे महिन्यात |
| ६ | नीळकंठ, Indian Roller (Coracias Benghalensis) | प्रत्येक वेळी २ च्या संख्येने २ पक्षी | प्रत्येक दिवशी मे महिन्यात जास्त वेळा पाणपोईवर जास्त वेळ थांबणे. |
| ७ | लाल पाठीचा खाटीक, Rufous – backed shrike (Lanius Schach) | २ च्या संख्येने | मे महिन्यात, फार कमी वेळा ये-जा |
| ८ | भारतीय दयाळ, Indian Robin (Saxicoloides Fulicata) | २-२ च्या संख्येने २ जोड्या ४ पक्षी | प्रत्येक दिवशी सतत ये-जा मे महिन्यात जास्त |
| ९ | कावळा, House Crow, (Corvus Splendens) | ४, ६, ८ च्या संख्येने | दररोज सकाळ-सायंकाळ सुर्योदय व सुर्यास्ताच्या वेळी |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143 | April 2019
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 188 : Social and Science Innovation

| | | | |
|---|---|---|---|
| १० | [illegible], Jungle Crow, (Corvus Macrorhynchos) | २ च्या संख्येत | प्रत्येक सकाळी, सायंकाळी |
| ११ | टकाचोर, Rufous Treepie (Dendrocitta Vagabundra) | २, ४ च्या संख्येत | प्रत्येक दिवशी ये सतत ये-जा |
| १२ | भांगपाडी मैना, Brahminy mena (Sturnus Pagodarum) | २, ४ च्या संख्येत | मे महिन्यात |
| १३ | साळुंकी, Common myna (Acridotheres Tristis) | ४, ६, ८ च्या संख्येत | सकाळ-सायंकाळ |
| १४ | लहान कवडी, Litte Brown Dove (Streptopelia Senegalensis) | २, ४ च्या संख्येत | दररोज सकाळ-संध्याकाळ |
| १५ | कोतवाल, Black Drongo (Dicrurus [illegible]) | केवळ १ च्या संख्येत | मे महिन्यात सतत ये-जा |
| १६ | ठिपकेदार नाचरा, White throated Faintail (Rehipidura Albicollis) | केवळ १ च्या संख्येने | मे महिन्यात पाणपोईवर पाणी प्यायल्यावर कॉईरा जाऊन १ वेळा |
| १७ | घार, काळा Black Kite (Milvus Migrans) | केवळ १ | मे महिन्यात सायंकाळी ६.०० च्या सुमारास केवळ एकदा |
| १८ | मोठा राखी, Great Tit (Parusmajor) | चार संख्येने घोळक्या मध्ये, २,४,६, ८ असे | प्रत्येक दिवशी सतत ये-जा |
| १९ | छोटा अंगारक, Small Minivet (pericrocotus cinnamomeus | केवळ २ | मे महिन्यात - सायंकाळी २ दिवस |

तक्ता क्रमांक १ : 'पक्षी पाणपोईस भेट देणारे पक्षी' या शिर्षकाचा आहे. या तक्त्यात भेट देणाऱ्या पक्षांचे मराठी व इंग्रजी नाव, शास्त्रीय नाव (कंसात), संख्या आणि इतर निरीक्षणे नोंदविली आहेत.

निरीक्षणे :




१. संशोधन निबंधाच्या काळात पक्षी पाणपोईस भेट देणाऱ्या पक्षी प्रजातींची एकूण संख्या १९ आहे.

२. मार्च महिन्यात येणाऱ्या पक्षांची संख्या कमी आहे. ती उत्तरोत्तर वाढून मे महिन्यात जास्त आढळली.

३. येणाऱ्या पक्षांचे वर्गीकरण पुढील प्रकारे करता येते. सतत ये-जा करणारे पक्षी, केवळ सकाळ-सायंकाळ येणारे पक्षी, केवळ सकाळी येणारे पक्षी, फार कमी वेळा येणारे पक्षी, केवळ एकदा आलेले पक्षी, जास्त वेळ पाणपोईवर थांबणारे पक्षी.

४. सतत ये-जा करणाऱ्या पक्षांमध्ये पुढील पक्षी आहेत. (पक्षाच्या नावापुढे त्यांचा तक्त्यातील क्रमांक टाकला आहे. शिंपी (१), लालबुडा बुलबुल (३), भारतीय दयाळ (८), टकाचोर (११), कोतवाल (१५), मोठा राखी (१८) या पक्षप्रजातींची संख्या ०[illegible] आहे.

५. केवळ सकाळ-सायंकाळ येणाऱ्या पक्षांमध्ये पुढील पक्षी आहेत. ठिपकेवाला कवडा (४), कावळा (९), रानकावळा (१०), साळुंकी (१३), लहान कवडी (१४), या प्रजातीत पाच पक्षी आहेत.

६. केवळ सकाळी येणाऱ्या पक्षात एकच पक्षी आहे तो म्हणजे पांढऱ्या छातीचा धीवर (५), सुर्योदयाच्यावेळी सकाळी जवळपास अर्धा तास हा पक्षी पाणपोईत सूर मारताना आढळला. एप्रिलमध्ये एक दिवस सकाळी डुबकन असा आवाज झाला. संशोधकाचे तिकडे लक्ष गेले. हा पक्षी पाणपोईत डुबकी मारून आपले अंग भिजवत होता व पाणी पीत होता. तो कॅमेऱ्यात चित्रांकित झाला आहे.

७. फार कमी वेळा येणारे पक्षी या प्रकारातील पक्षी प्रजाती संख्या केवळ ३ आहे. लाल पाठीचा खाटीक (७) ठिपकेदार नाचरा (१६), छोटा अंगारक (१९).

८. केवळ एकदा आलेला पक्षी घार (१७) आहे. मे महिन्याच्या सायंकाळी संशोधनकर्ता पाणपोईवर येणाऱ्या पक्षांची शुटींग घेत असताना स्क्रीनवर पाणपोई जोराने हालत असल्याचे लक्षात आले. आकाशात पाहिल्यावर एक मोठा पक्षी पाणपोईजवळ येत होता. तो सरळ आकाशातून पाणपोईवर बसला तेव्हा पाणपोई टोलकासारखी हालत होती. दोन मिनीटानंतर ती थोडी स्थिर झाल्यावर तो पक्षी शांतपणे पाणी पिऊ लागला. त्यानंतर २ मिनीटे तसाच बसला. संशोधकाच्या हालचालीचा त्याला सुगावा लागला होता. तथापि तो शांतपणे पाणी पीत होता. त्यास फार तहान लागल्याचे लक्षात आले. त्यानंतर तो पाणपोई खालच्या जागेवर, जमिनीवर बसला आणि त्याने काहीतरी खाल्ले. त्याच्या शेपवाने पक्षांना उष्णतेच्या काळात पाण्याची किती गरज असते हे जाणवले. संशोधकास त्यामुळे तो करत असलेल्या प्रयत्नांचे मोल समजले.

९. जास्त वेळ पाणपोईवर थांबणाऱ्या पक्ष प्रजातीत पुढील पक्षी प्रजाती आहेत. शिंपी (१), दयाळ (२), निळकंठ (६), भारतीय दयाळ (८), घार (१७), छोटा अंगारक (१९) या प्रजातीचे पक्षी पाणी प्याल्यावर जास्त वेळ



Printed by : PRASHANT PUBLICATIONS

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 180 : Social and Science Innovation

थांबत होते.

१०. निसर्गात जसजसा उन्हाचा दाह वाढतो, तसतसे येणाऱ्या पक्षांची संख्या वाढताना आढळली. अनेक वेळा वेगवेगळ्या प्रजातीचे पक्षी एकदाच पाणी पिताना आढळले. तहान या मुद्यावर सर्वजण एकत्र होते. तिथे कुणीही भांडतांना आढळला नाही.

११. पाणपोई मंदिजवळ होती. २०१२ मध्ये सुरुवातीस संशोधक सकाळी तिथे थांबत असे. हे स्थळ त्याच्या कार्यालयात ये-जा करण्याचे स्थळ होते. तिथे दररोज स. ६ ते ८ च्या दरम्यान संशोधकाची पांढऱ्या रंगाची गाडी थांबत होती (डिझायर/मारोती) 'तो तिथे पाणी टाकतो. एक शिक्षित मनुष्य असे करतो तर आपण का नाही', असा विचार लोकांमध्ये आला. त्यामुळे पाणपोईत पाणी टाकणाऱ्यांची संख्या वाढली.

१२. 'आम्ही पाखरांसाठी पाणी टाकले', 'तिथे रंगीत पाखरू आले होते' असा काही प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. त्यापैकी काहींनी त्यांच्या घरी पक्षांना पाणी पिण्यासाठी भांडे ठेवले. काहींनी गावातल्या मंदिराशेजारी पाणपोई लावली, अशी संख्या एकूण ८ होती.

**समारोप व निष्कर्ष :**

संशोधनकर्त्याने प्रस्तुत पाणपोईला सन २०१२ मध्ये लावली. या संशोधन निबंधातील निष्कर्ष २०१८ या वर्षातील आहेत. कृत्रिम पध्दतीने विशेष प्रयत्न करून पक्षांसाठी उन्हाळ्याच्या महाप्याने तृष्णा भागविण्याचा प्रयत्न झाला. अशा प्रयत्नामुळे पक्षी संवर्धन निश्चित झाले. यासंदर्भात स्थानिक वृत्तांकने व आधुनिक इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या सहाय्याने प्रसिध्दी देण्यात आली. विशेष म्हणजे या उपक्रमास माउथ टू माउथ पब्लिसिटी मिळाली. त्यामुळे हा प्रकल्प अनेकांच्या अनुकरणाचा विषय झाला. मूलस्थानी जैवविविधता संवर्धन प्रकल्पातील कृत्रिम पद्धतीने संवर्धनाचा हा प्रकार आहे. याच प्रकारास एकाच वेळी वृक्ष व जलसंवर्धन आणि पक्षी पाणपोई असे उपक्रम सुरू असावेत. निसर्गातील पक्षी संवर्धनाची नैसर्गिक व्याप्ती जसजसी वाढेल तसतशी कृत्रिम पक्षी संवर्धनाची व्याप्ती कमी करावी लागेल. या दोघांच्या योग्य त्या समन्वयातूनच पक्षांचे संवर्धन पर्यायाने जैवविविधता संवर्धन शक्य आहे.

**संदर्भ :**

१. -The Book of Indian Birds : Salim Ali, 2002, Oxford Uni Press, BNHS. 13th Edition.
२. भारतीय पक्षी : सलिम अली आणि फतेहअली, अनु. रा.वि. सोवनी, एन.बी.टी. इंडिया, न्यू दिल्ली.
३. पक्षी जगत : सचिन मेन, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १२
४. www.wikipedia on biodiversity
५. संशोधकाच्या निरीक्षण नोंदी वही, सन २०१८.

Impact Factor [illegible] | Special Issue [illegible] | March 2019 | ISSN - 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International Research Journal

# Women Empowerment

- GUEST EDITOR -
Dr. Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Impact Factor - 6.261 • Special Issue - 167 • Mar 2019 • ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT

... Guest Editor ...

**Dr. Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

21. The Gallantry Nature of Vidarbhian Women Successfully Fought Against British Government in Quit India Movement: A Historical Perspective ———— 48
Dr. Prashant R. Dhage

22. Contribution of Women Playback Singers in The Field of Film Music From 1940'S-1960'S Era ———— 50
Jaspreet Kaur Jassal

23. Content Analysis on Women's role in Politics in the context with Tamil Nadu ———— 53
Saranya. P

24. Human Rights and Women ———— 57
Ku. Tai B. Uke

25. Women and Leadership ———— 59
Dr. Yashavanthi K.

26. The Role of Music in Women Empowerment In India ———— 61
Shallu Jasrotia

27. Gender Equity And Women Power In India ———— 63
Dr. S. S. Kawale

**मराठी**

२८. निर्मलग्राम पुरस्कार योजनेतील महिलांच्या सहभागामुळे त्यांच्यात झालेल्या बदलांचे अध्ययन ........ ६६
प्रा. राजु दिगंबरराव भोंडे

२९. यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शेतमजुर स्त्रियांची सामाजिक–आर्थिक स्थितीचे अध्ययन ........ ७०
प्रा. सुनिता अर्जुनराव राठोड

३०. महिला सक्षमीकरण व कौटुंबिक हिंसाचार ........ ७३
डॉ. सत्यपाल एस. वाघे

३१. भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासामध्ये महिलांची भूमिका (गायन, वादन व नृत्य) ........ ७६
प्रा. शिवदास विठ्ठलराव शिंदे

३२. विदर्भातील महिलांच्या शैक्षणिक विकासाचा भौगोलिक अभ्यास ........ ७८
डॉ. मनिषा अनिल पवडे

३३. महिला सबलीकरण : संकल्पना आणि भारतातील महिला सबलीकरणाविषयी धोरणात्मक दृष्टीकोन ........
डॉ. संजय रामराव कुमार

३४. सिनेसंगीत आणि महिला ........ ८३
एकबोटे अर्चना उमाकांत

३५. असंघटीत महिला कामगार आणि कायदे... ........ ८६
डॉ. भरत चिंतामणी बंडगर

३६. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांचे स्थान ........ ९०
डॉ. ज्योती शेषराव दिघाडे

३७. महिला सक्षमीकरण : कायदेविषयक साक्षरता ........ ९३
डॉ. धर्मेंद्र तेलगोटे

३८. स्त्री विषयक अधिकारात फुले, शाहू, आंबेडकर यांचे योगदान ........ ९६
प्रा. डॉ. विलास एन. ढेंगळकर

३९. ग्रामीण महिला व सक्षमीकरण ........ ९८
डॉ. रेखा सवाने

४०. ताराबाई शिंदेचा स्त्रीवादी दृष्टिकोन व आजच्या स्त्रियांचे सक्षमीकरण ........ १०१
प्रा. डॉ. ईश्वर सोमनाथे

४१. भारतातील स्त्री सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची स्थिती एक मूल्यमापन ........ १०५
प्रा. डॉ. गजेंद्र कदम

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162 : Women Empowerment*
ISSN : 2348-7143
March 2019

# महिला सक्षमीकरण : कायदेविषयक साक्षरता

**डॉ. धर्मेन्द्र तेलगोटे**
प्राचार्य बा. देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ पिन नं. ४४५३०६

आपल्या देशात सक्षमीकरणा संदर्भात वेगवेगळ्या पातळ्यांवर काम सुरू असल्याचे आपल्या लक्षात येते. स्वातंत्र्योत्तर भारताने जे संविधान स्वीकारले त्या संविधानात महिलांच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने अनेक तरतुदी आहेत. त्या तरतुदींना अंमलात आणण्यासाठी वेगवेगळे कायदे, संहिता, नियम व न्यायालयांनी दिलेले निर्णय अस्तित्वात आहेत. तथापि या सर्वांच्या बाबतीत महिलांना अवगत करणे आवश्यक आहे. थोडक्यात महिलांची कायदेविषयक साक्षरता आवश्यक आहे. प्रस्तुत शोधनिबंध महिलांना कायदेविषयक बाबतीत साक्षर करण्यासाठी कोणकोणत्या वैधानिक संरचना उपलब्ध आहेत त्यावर प्रकाश टाकतो आहे. हीच या शोधनिबंधाची व्याप्ती आहे.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात पुरूषाच्या बरोबरीने स्त्रिया सहभागी झाल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात सुध्दा स्त्रियांच्या संदर्भात महत्वपूर्ण कायदे आहेत. सतीप्रथा निर्मुलन कायदा-१८२९ मध्ये पास झाला, या कायद्याने स्त्रीयांच्या सती जाण्यास प्रतिबंध टाकण्यात आला. हिंदु पुनर्विवाह कायदा- १८३६, या कायद्याने हिंदु विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास परवानगी देण्यात आली. बालविवाह (शारदा) कायदा-१९२९, या कायद्याने बालविवाहास प्रतिबंध करण्यात आला. हे सर्व कायदे स्वातंत्र्यपूर्व काळात झाले. सध्या स्त्रियांच्या संदर्भात भारतात खालील वैधानिक किंवा कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आहेत.

**अ) भारतीय संविधानातील तरतुदी** – भारतीय संविधानातील खालील कलमांमध्ये स्त्रीयांच्या संदर्भात तरतुदी आहेत.

» कलम १४ - भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याने समानता

» कलम १५ - धर्म, वंश, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर भेदभाव करण्यास मनाई.

» कलम १६ - सार्वजनिक सेवांच्या बाबतीत समान संधी.

» कलम ३९ (ब) - पुरूष व स्त्रिया यांना समान कामाबद्दल समान वेतन दिले जाईल.

» कलम ३९ (क) - उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरूष नागरीकांना सारखाच असावा.

» कलम ३९ (ड) - स्त्री व पुरूष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

» कलम ४२ – राज्य हे कामाच्या बाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुतीविषयक सहाय्यासाठी तरतूद करेल.

» कलम ५१ क (ड) - धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलिकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये स्वयंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे, स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

» कलम २४३ (घ) (२) - (स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये) राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येपैकी एकतृतीयांश जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात येतील.

» कलम २४३ (घ) (३) - पंचायतीमध्ये भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एकतृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढया जागा (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

» कलम २४३ (न) - (नगरपालिका) राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या जागका अनुसूचित जाती किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीच्या मलिांसाठी राखून ठेवण्यात येतील.

» कलम २४३ (न) ३ - प्रत्येक नगरपालिकेमध्ये एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढ्या जागा (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

» कलम २४३ (न) ४ - नगरपालिकांमधील सभाध्यक्षांची पदे राज्ये विधानमंडळ कायद्याद्वारे तरतुद करेल अशा रितीने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

» कलम २४३ (घ) - ग्राम किंवा कोणत्याही पातळीवर सभाध्यक्षांची पदे, राज्यविधीमंडळ कायद्याद्वारे तरतूद करेल अशा रितिने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

» संविधान (त्र्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम, १९९२ व संविधान (चौऱ्याहत्तराव्या सुधारणा) अधिनियम १९९२ या संविधान दुरूस्ती कायद्याने अनुक्रमे भाग-नऊ, पंचायती व भाग-नऊ क नगरपालिका हा भाग संविधानात समाविष्ट करण्यात आला. तो दि. १ जून १९९३ रोजी लागू करण्यात आला. त्यानुसार



Printed by : PRASHANT PUBLICATIONS

संविधानात महिलांच्या आरक्षणाची तरतूद समाविष्ट करण्यात आली.

ब) विशेष कायदे – भारतीय संविधानात महिलांसाठी असलेल्या तरतुदी प्रत्यक्षात येण्यासाठी खालील कायदे भारतात अस्तित्वात आहेत.

१) विशेष विवाह अधिनियम १९५५, हिंदु-विधवा पुनर्विवाह १९५६, हिंदु उत्तराधिकारी अधिनियम १९५६. या कायद्यान्वये महिलांना त्यांचा विवाह व उत्तराधिकारी होण्यासंदर्भात समानतेचे हक्क देण्यात आले आहेत.

२) भरण-पोषण कायदा १९५६-या कायद्याने पत्नी, पुत्र, पुत्र-वधु, अवयस्क मुले, वृध्द आई-वडिल यांच्या भरण-पोषणाच्या तरतूदी आहेत.

३) हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ – या कायद्याने सर्व प्रकारचा हुंडा मग तो वस्तु किंवा पैशाच्या स्वरूपात असो देण्यास मनाई करण्यात आली आहे.

४) मातृत्व लाभ कायदा – १९६१, या कायद्याने मातृत्वाची रजा१८० दिवसाची आहे. मुलाच्या किंवा बाळाच्या संगोपणासाठी त्याच्या आईस दोन वर्षांची पगारी सुट्टी मिळू शकते. ही रजा सवलत बाळाच्या १८ वर्षापर्यंत केव्हाही घेता येते.

५) संपत्ती अधिकार कायदा – २००५, या कायद्याने महिलांना त्यांच्या पैतृक संपत्तीत समान-अधिकार मिळाला.

६) विवाह कायदा २०१०- या अंतर्गत महिलेस घटस्फोटानंतर पतीच्या संपत्तीवर सम-समान अधिकार प्राप्त आहे.

क) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर कोड (CRPC) मध्ये महिलांसाठी खालील तरतूदी आहेत.

१) कलम १५६-३ – जर एखाद्या महिलेचा रिपोर्ट घेण्यास पोलिस ठाण्यात टाळाटाळ केली जात असेल किंवा विलंब केला जात असेल तर ती महिला साध्या कागदावर उपविभागीय अधिकाऱ्याकडे (SDM) आपला अर्ज देऊ शकते. अशा प्रकरणी (SDM) पोलिसांना रिपोर्ट दाखल करून घेण्याचे निर्देश देतो.

२) कलम २०० – जर एखाद्या महिलेस तीच्यावर झालेल्या अन्याय अत्याचारासंदर्भात तक्रार दाखल करण्यास पोलीस स्टेशनमध्ये जाण्याची ईच्छा नसेल तर ती आपली तक्रार न्यायाधिशाकडे घेवून जाऊन शकते. न्यायाधीश तीची तक्रार दाखल करून घेतील आणि आपल्या स्तरावर चौकशी करतील किंवा चौकशी करण्यासाठी कोणत्यातरी पोलीस अधिकाऱ्यास नियुक्त करतील.

३) कलम ३१२ व ३१५ – या कलमान्वये महिलांना गर्भधारणा व गर्भसुरक्षा अधिकार प्रदान केला आहे. एखाद्या स्त्रिचा गर्भपात तीला माहिती केल्याशिवाय अथवा तिच्या परवानगीशिवाय करता येत नाही. अन्यथा अशा व्यक्तींना सात वर्षांची शिक्षा होऊ शकते.

४) कलम कलम ४०४ – एखादी महिला आपले दागिने अथवा वस्तु किंवा सामना एखाद्या व्यक्तीको सुरक्षितपणे ठेवण्यासाठी देऊ शकते. पण त्याने ते परत न केल्यास ती त्याची तक्रार करू शकते, तेव्हा संबंधितास तीन वर्षांची शिक्षा होवू शकते.

५) कलम ४०३ – एखाद्या पुरूषाने स्त्रीशी लग्न करण्याचे आश्वासन देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले असतील तर ती त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करू शकते.

ड) सुरक्षिततेसंबंधी इतर अधिकार – महिलांना त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात खालील अधिकार आहेत.

१) जर एखादी महिला आपली तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेली, तीथे संबंधीत पोलीस अधिकारी तिची तक्रार नोंदवत नसेल तर त्या अधिकाऱ्याची त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार नोंदविण्याचा अधिकार त्या स्त्रीस आहे. अशा स्थितीत त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही होते.

२) एखादी महिला आपली तक्रार नोंदविण्यासाठी पोलिस स्टेशनमध्ये जाऊ शकत नसेल किंवा तिला कोणाचीतरी भिती वाटत असेल तर ती आपली तक्रार रजिस्टर पोष्टाने किंवा ऑनलाईन प्रणालीने उप-विभागीय अधिकारी किंवा उप-विभागीय आयुक्त या समकक्ष अधिकाऱ्याकडे नोंदवू शकते.

३) सुप्रिम कोर्टाच्या आदेशान्वये महिलांना सुर्यास्तानंतर व सुर्योदय होईपर्यंत अटक करता येत नाही. महिलांशी संबंधित सर्व कार्यवाही दिवसा होईल. तथापि जर प्रकरण संवेदनशिल असेल तर महिला पोलीस अधिकारी व न्यायाधीशांचा लिखित आदेश या आधारावर कार्यवाही करता येईल.

४) महिलेच्या/महिलांच्या अटकेच्या वेळेस महिला शिपाई असणे बंधनकारक आहे. अन्यथा तीला अटक करता येणार नाही.

६) महिलेस असा अधिकार आहे की, ती आपली तक्रार कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये नोंदवू शकते. ज्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे ते पोलीस स्टेशन ती तक्रार संबंधित पोलीस स्टेशनपर्यंत पोहचवेल.

इ) महिलांच्या मदतीसाठी संस्था – स्त्रीयांच्या संदर्भात समानता अस्तित्वात यावी त्यांचे कोणत्याही प्रकारे शोषण होऊ नये म्हणून खालील संस्था कार्यरत आहेत.

१) भारत महिला आयोग – दिनदयाल मार्ग, ई दिल्ली, new.@nic.in किंवा http://new.nicca.in

२) राष्ट्रीय महिला कोष – http://rmk.nic.in गरीब व गरजू महिलांच्या साठीच्या योजनांची माहिती मिळविणे.

३) घटस्फोट, घरगुती अत्याचार, अन्याय या विषयांवर कायदेशीर सल्ल्यासाठी www.legislative.com

४) महिलांच्या स्वयंरोजगारासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत, www.sewa.org

५) महिलांच्या स्वयंरोजगार व नोकरीविषयक संबंधी www.careersdiah.com

६) महिलांशी संबंधित सर्व माहितीसाठी www.aadhiabadi.com, www.sitagita.com

७) किरण बेदी प्रथम महिला आय.पी.एस. पोलीस अधिकारी यांच्या कायदेशीर सल्ल्यासाठी www.saferindia.com

८) संयुक्त राष्ट्रसंघाने 'संयुक्त राष्ट्र लिंग समानता आणि महिला सक्षमीकरण' असा मंच तयार केला आहे. त्याला UN Women असे म्हणतात त्याची वेबसाईट www.unwomen.org ही आहे.

९) महाराष्ट्र राज्य महिला आयोग- गृहनिर्माण भवन, मेझानिन फ्लोअर, गांधी नगर, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र ४००० ०५१.

**समारोप व निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महिलांच्या कायदेविषयक साक्षरतेसाठी कायद्याच्या अनुषंगाने ज्या तरतुदी आहेत त्या मांडणीत आल्या आहेत. त्यामध्ये भारतीय संविधानातील तरतुदी, विशेष, कायदे, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, सुरक्षेसंदर्भातील इतर अधिकार व महिलांच्या मदतीसाठीचा संस्था यांचा समावेश आहे.

१) महिलांच्या कायदेविषयक साक्षरतेच्या संदर्भातील तरतुदी सर्वसामान्य महिला, वय वर्ष १७ ते २२ या गटातील स्त्रिया व इतर वयोगटातील मुली किंवा महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी त्या सोप्या भाषेत मांडून त्यांच्या पर्यंत पोहचविल्या पाहिजेत. राज्य महिला आयोगाने यासंदर्भात ग्रामीण व शहरी स्तरावर असे मेळावे, मार्गदर्शन कार्यशाळा घ्याविन्यास हे फायद्याचे ठरू शकते.

२) कायदेविषयक साक्षरता हा विषय शालेय पाठ्यक्रमात (१०+२ पातळीवर) समाविष्ट करता येतो का त्याचा विचार व्हावा.

३) उच्च शिक्षणामध्ये पदवी पातळीवर महाराष्ट्रात पर्यावरण अध्ययन हा विषय आवश्यक विषयक आहे. या विषयात सामाजिक पर्यावरण या शिर्षकाखाली प्रस्तुत विषय अंतर्भूत करावा. त्यासाठीचा पाठपुरावा राज्य महिला आयोगाने करावा.

४) महिला सक्षमीकरण चे अनेक मार्ग आहेत त्यात कायदेशीर मार्गांचे महत्त्व अद्वितीय आहे. महिला कायद्यांबाबत साक्षर झाल्यास निश्चितच सक्षम होती.

**संदर्भ**

१) भारताचे संविधान, भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय, २००९


२) डॉ. प्रशांत शिंदे, भारतीय शासन व स्थानिक स्वराज्य संस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१८

३) Dr. Supinder Kaur, The Criminal Procedure Code' Lexis Nexis, 204. New Delhi.

४) www.sitagita.com

ISSN : 2277-8063

विशेषांक
३१ मार्च २०१९

# गांधी 
आणि
# मानवी हक्क

*Father of our Nation*



2018-19

Navjyot
नवज्योत

International Interdisciplinary Research Journal
(Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management)

१०५
३७) आजचे भौतिक आव्हान आणि गांधी विचार पर्याय
प्रा. कल्पना निंभार्ते १०७
३८) गांधी विचारातून आकारास आलेल्या नवसंकल्पना
डॉ. मंगेश रणदिवे ११०
३९) महिलांचे सक्षमीकरणाच्या दृष्टिने गांधी विचारांचे औचित्य
प्रा. पवन महंत ११३
४०) महात्मा गांधीजींचे मानवी विकासातील योगदान : एक दृष्टीक्षेप
डॉ. राजेंद्र बेलोकार ११६
४१) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता
डॉ. धर्मेंद्र तेलगोटे ११८
४२) महात्मा गांधीच्या विचाराची प्रासंगिकता
डॉ. अमर बोंदरे १२०
४३) स्वातंत्र्याच्या पहाटवेळी पडलेले एक स्वप्न: गांधीवाद तर नसेल ना?
डॉ. व्ही. एस. इंगळे १२४
४४) गांधीचा राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद
प्रा. सरला मेश्राम १२६
४५) गांधी विचारातून आकारास आलेल्या नवसंकल्पना
प्रा. प्रविण गुल्हाने १२८
४६) ग्रामस्वावलंबन आणि मं.गांधीजीचे चिंतन
प्रा. जयवंत जुकरे १३१
४७) स्वातंत्र्य आंदोलनातील सत्याग्रह कार्यक्रम
प्रा. बाळकृष्ण रामटेके १३४
४८) ग्रामस्वावलंब आणि गांधी चिंतन
प्रा. लालचंद मेश्राम १३६
४९) महात्मा गांधीची सत्य व अहिंसा संकल्पना : एक ऐतिहासिक अध्ययन
डॉ. सतीश चाफले १३८
५०) भारतात महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा उदय
कु. हर्षा बेहरे १४०
५१) स्वातंत्र्य आंदोलनातील सत्याग्रह कार्यक्रम
कु. तनुजा पोटे १४२
५२) स्त्री सक्षमीकरण आणि म. गांधी
डॉ. शरद सांबारे १४४
५३) म. गांधी आणि मानवी हक्क
संदीप तुंडूरवार

ISSN: 2277-8063

Navjyot / Special Issue : 2019

# महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता

डॉ. धर्मेंद्र तेलगोटे, प्राचार्य, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ

महात्मा गांधींचा जन्म १८६९ मध्ये झाला. ते भारताच्या राजकीय क्षितीजावर पहिल्या महायुध्दानंतर म्हणजे १९१४ नंतर आले. त्यानंतर अहोरात्रपणे आपल्या उक्ती व कृतीचा ठसा त्यांनी १९४८ पर्यंत हिंदुस्थानवर व जगावर उमटविला. आज आपण गांधीजींचे १५० वे जन्मशताब्दी वर्ष साजरे करत आहोत. या पार्श्वभुमीवर महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिता काय आहे, हा प्रस्तुत लेखाचा विषय आहे.

महात्मा गांधी जुलै १९१४ मध्ये दक्षिण आफ्रिकेतून भारतात आले. तेव्हा त्यांनी कोणतेही कार्य सुरु करण्यापूर्वी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी देशासाठी सार्वजनिक कार्य करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. 'राजकीय क्षेत्रात सक्रीय पदार्पण करण्यापूर्वी देशातील परिस्थिती नजरेखालुन घाला', असा सल्ला श्री. गोखले यांनी त्यांना दिला. त्याला अनुसरून गांधींनी देशभराचा दौरा केला. या दौऱ्यातील सर्व प्रवास रेल्वेच्या तिसऱ्या श्रेणीमध्ये त्यांनी केला. या दौऱ्यात त्यांना भारतातील दारिद्र्य, निरक्षरता, दुःख जाणवले. या भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्व करावयाचे असेल तर त्याचे दुःख, त्यांचे प्रश्न आपले प्रश्न आहेत, असे आपण मानले पाहिजे, अशी त्यांची धारणा झाली. देशातील कोट्यवधी जनता दारिद्र्यात असताना आपणास सुखासिन जीवन जगण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी सर्वप्रथम वेष पालटला. स्वतः कातलेल्या सुताचा एक पंचा अंगावर आणि फारच कडाक्याची थंडी असेल तर खांद्यावरएखादी शाल असा पोषाखात जाणिवपूर्वक बदल केला. आफ्रिकेत असताना व भारतात परतल्यावर प्रारंभीच्या काही दिवसांमध्ये पाश्चात्य पध्दतीच्या पोषाखात ते असत. त्यांच्या पोषाखपध्दतीतील हा अमूलाग्र बदल महत्वपूर्ण मानला पाहिजे.

सार्वजनिक स्वरूपामध्ये गांधींनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये जेव्हा काम सुरू केले त्यावेळी कॉंग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन गट होते. जहालांचे नेतृत्व लोकमान्य टिळक करत होते. जहालांनी इंग्रजी सत्ता परकीय असल्याने तिला विरोध केला पाहिजे, ही भूमिका मांडली होती. याउलट मवाळांचा इंग्रजांच्यावर विश्वास होता. ब्रिटीश जितक्या सुधारणा देतील तेवढ्या स्वीकाराव्यात असा मताचे मवाळ होते. गांधी जेव्हा सक्रीय झाले तेव्हा त्यांचे राजकीय गुरू ना. गोपाळकृष्ण गोखले यांचा मृत्यू झाला होता (१९१५). तसेच १९२० मध्ये टिळकांचे निधन झाले होते. या दोघांच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. आतापर्यंत कॉंग्रेस सामान्यांचे प्रतिनिधीत्व करते असे वाटत नव्हती. गांधींनी त्यांच्या विचार व कृतीमुळे तिला सर्वसामान्यांची चळवळ बनविले. एखादी चळवळ जर लोकांसाठी व्हायची असेल, त्या चळवळीस लोकचळवळ म्हणून मान्यता मिळवायची असेल तर ती लोकभाषेत व लोकभूषेत असली पाहिजे. याचा विचार गांधींनी केला. कॉंग्रेसच्या सर्वच चळवळींमध्ये गांधी खादीच्या भारतीय वस्त्रांमध्ये वावरू लागले. तद्वतच लोकांना किंवा जनतेला संघटित करण्यासाठी हिंदी व स्थानिक भाषा वापरू लागले. हा फार मोठा बदल होता. या बदलामुळे कॉंग्रेस लोकांचे प्रतिनिधीत्व करू लागली, असे म्हणता येते. थोडक्यात चळवळीचे लोकशाहीकरण केले पाहिजे असा फार मोठा विचार गांधींनी आपणास दिला आहे.

**निशस्त्र प्रतिकार : ब्रिटीश कालखंड**

गांधींनी सत्याग्रह, सविनय कायदेभंग, स्वदेशी याचा पुरस्कार केला आहे. १९१७ मध्ये बिहारमधील चंपारण्य येथे निःशस्त्र प्रतिकाराची त्यांनी सुरुवात केली. १९१८ मध्ये खेडा येथे साराबंदी चळवळ सुरू केली. तर १९२० मध्ये असहकार चळवळ सुरू झाली. गांधींच्या या चळवळींचा सर्वोच्च बिंदू म्हणजे १९४२ चे चलेजाव आंदोलन होय. गांधींच्या या ब्रिटीश विरोधी मार्गांचे वैशिष्ट्य म्हणजे हे सर्व प्रतिकार निःशस्त्र व शांततेच्या मार्गाने केलेले आहेत. भारतावर इंग्रजांनी आपले राज्य प्रस्थापित केले. त्यांची अनेक कारणे सांगितली जातात. त्यापैकी एक कारण म्हणजे त्यावेळच्या भारतीय राज्यांच्या तुलनेत ब्रिटीश शस्त्रांच्या बाबतीत आधुनिक होते. ब्रिटीशांकडे लांब पल्ल्याच्या तोफा व बंदुका होत्या, त्याच बळावर त्यांनी भारतीय राजेरजवाड्यांचा पराभव केला. अशा बलाढ्य शासन व्यवस्थेच्या विरोधामध्ये शस्त्राच्या साहयाने लढणे केवळ अशक्य आहे. या शासनव्यवस्थेशी लढायचे असेल, त्यांचा प्रतिकार करायचा असेल तर त्याच्याशी विनाशस्त्र व शांततेनेचे लढले पाहिजे असा विचार सर्वप्रथम महात्मा गांधींनी दिला. गांधींच्या सर्वच चळवळी जेव्हा ब्रिटीश सत्ता चिरडून टाकत असे. निशस्त्र सत्याग्रहींवर जेव्हा लाठीहल्ला केला जात असे, त्यांच्यावर ब्रिटीश अश्वदल चालून जात असे तेव्हा त्यांची प्रतिक्रिया ब्रिटीश पार्लमेंट व ब्रिटीश वृत्तपत्रामध्ये उमटत असे. ब्रिटीश इंडियातील ब्रिटीश सरकार लोकांशी वागताना त्यांचे मूलभूत हक्क कसे पायदळी तुडवते याची चर्चा जेव्हा होत असे, तेव्हा ब्रिटीशांना आपल्याच देशात त्याच्या दमनकारी कृतीचे समर्थन करणे अशक्य होत असे.

**निशस्त्र प्रतिकार : स्वातंत्र्योत्तर कालखंड**

'वाईल्ड लाईफ फर्स्ट विरूध्द भारत सरकार' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १३ फेब्रुवारी २०१९ रोजी एक आदेश दिला. ज्यांचे वनजमिनीवरील हक्काचे दावे फेटाळले गेले असतील त्यांना हुसकावून लावावे व तशा कारवाईचा अहवाल प्रतिज्ञापत्राद्वारे १२ जुलै २०१९

 ISSN: 2277-8063

करुन सादर करावा' असा तो आदेश आहे. सन २००६ च्या वनहक्क कायदा आहे. या कायद्याने १३ डिसेंबर २००५ च्या आधी जर आदिवासी जमीन कसत असतील त्यांना त्यावर व्यक्तिगत हक्क मिळतो. सांस्कृतिक व अन्य उद्देशासाठी देवराया, स्मशान [illegible] असणाऱ्या जमिनीवर सामुहिक हक्क मिळतील अशी तरतूद आहे. या हक्कांचे दावे ग्रामसभेने स्वीकारावे. ते उपविभागीय व जिल्हा वनसमित्यांकडे जातील ते मान्य करतील किंवा अमान्य करतील, अशी तरतूद या कायद्यात आहे.

सन २०१८ पर्यंत ४२लाख दावे दाखल झाले. त्यापैकी १८ लाख ८८ दावे फेटाळले गेले. वनहक्क समित्या व उपस्तरीय समित्यातील अधिकारी मात्र हे दावे फेटाळून लावू लागले आहे. आताच्या आदेशामध्ये १० लाख आदिवासींना त्यांच्या जमिनीवरून हुसकावून लावले आहे. छत्तीसगड या राज्यात उदांती सितानदी टायगर प्रोजेक्ट आहे. या भागात १७ लोकांची जंगलसमिती काम करते. ८० टक्के लोक आदिवासी आहेत. १२००० लोकसंख्येपैकी सर्वांनीच वैयक्तिक वनहक्कांसाठी दावा केला पण २० टक्के लोकांचे दावे मान्य झाले. या भागातला श्री. नागवंशी हा युवक म्हणतो, "२००९ पासून जमिनीसाठी अर्ज केला. प्रत्येक वर्षी अधिकारी येतात मी त्यांना नोंद करावयास सांगतो. पुढच्या वर्षी आले की, महसूलचे अधिकारी सांगतात, त्याची जमीन आमच्या रेकॉर्डवर नाही. वनविभागाचे अधिकारी सांगतात ती त्यांच्या नकाशात नाही. सर्वजण अशिक्षित आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या नोंदी त्यांना समजत नाहीत. यासाठी जातीचा पट्टा (CS) लागतो. तो त्यांच्याकडे नाही. संपूर्ण गाव आदिवासी आहे. अधिकारी सांगतात या जमिनी अभयारण्याच्या आसपास येतात. पण अभयारण्य १९८४ ला तयार झाले. आम्ही आदिवासी तर त्यापूर्वीपासून तिथे राहात आहोत." चिंदौला हे गाव करमास (Karmas) जातीचे आहे. जी जात पर्टिक्युलरली व्हर्नेबल ट्राईब्जमध्ये येत आहे. (PVTG) त्या गावचे ६२ दावे आहेत. पण एकही मान्य झाला नाही. अधिकारी येतात तेव्हा त्यांना बैलगाडी, नांगर, बखर विचारतात. गहू, ज्वारी, तूरची शेतात येते ती दाखवा म्हणतात. पण ते आदिवासी स्थानिक धान्य (Kodo किंवा Kutki) घेतात. ते शेती कुदळ व फावड्याच्या सहाय्याने करतात. ते अधिकाऱ्यांना मान्य नाही. थोडक्यात ट्रायबल वे-ऑफ लाईफ अधिकाऱ्यांना समजत नाही. हे व असे असंख्य प्रश्न आपल्या अवतीभोवती आहेत. हे जीवन-मरणाचे प्रश्न आहेत, ही लढाई कशी लढावी. नर्मदा धरणाच्या 'उंचीमुळे झालेल्या विस्थापनाची लढाई असो, नाही तर दारूबंदी घोषित करण्यासाठीचा प्रश्न असो. या सर्व प्रश्नामध्ये नागरिकांना सरकारसमोर व्यक्त होण्यासाठी सत्याग्रह, मूकनिषेध, उपोषण, या गांधीप्रणीत मार्गाशिवाय पर्याय नाही.

सरकारची ताकद किंवा शक्ती फार मोठी असते. इतिहास आपल्यास दिसते की सैन्य, प्रसार माध्यमे, दळणवळण याबर राज्य आपली मालकी प्रस्थापित करते. त्यामुळे गांधी जेव्हा ब्रिटीशांशी लढले तेव्हाही त्यांच्याशी शस्त्राने लढता येत नाही. याची जाणीव सर्वप्रथम त्यांना झाली. सर्व प्रकारची शस्त्रे संहार निर्माण करतात. शस्त्रधारकांशी सत्ताधाऱ्यांना लढणे सोपे असते. त्यामुळे गांधींनी निशस्त्र प्रतिकाराचा मार्ग सांगितला आणि तो प्रत्यक्षात आणला. त्यानंतर जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया, विनोबा भावे यांनी तोच प्रयोग केला. आता मेधा पाटकर, बाबा अढाव, अण्णा हजारे त्याच मार्गाने जात आहेत. देशात जी सर्व आंदोलने सुरू आहेत. त्यांनी गांधींचे एकमेव निशस्त्र प्रतिकाराचे शस्त्र स्वीकारले आहे. अशासकीय पातळीवरच नव्हे तर शासकीय पातळीवरही हेच शस्त्र एका सरकारच्या विरोधात दुसऱ्या सरकारचे प्रतिनिधी वापरत आहेत. पश्चिम बंगाल, दिल्ली व पॉन्डेचरी या राज्याचे मुख्यमंत्री (२०१९) सरकारच्याच विरोधात (केंद्र किंवा प्रशासक) सत्याग्रहास बसले होते. यावरून गांधींच्या विचारांची व कृतीची प्रासंगिकता कायम असल्याचे आपल्या लक्षात येते.

समारोपः

महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता प्रस्तुत लेखामध्ये तपासण्याचा प्रयत्न केला आहे. कोणतीही चळवळ लोकांच्या भाषेत व त्यांच्या आहार-विहाराच्या पध्दतीने सुरू केली. तर त्या चळवळीचे लोकशाहीकरण होते. काँग्रेसचे स्वरूप १९२० पूर्वी जहाल-मवाळ, ब्रिटीशवादी व विरोधी अशी विभागली होती. त्या चळवळीचे लोकशाहीकरण गांधींनी केले. त्यामुळे काँग्रेस लोकप्रतिनिधींची संस्था बनली.

कोणत्याही शासनव्यवस्थेशी नागरिक शस्त्राने लढू शकत नाहीत, कारण राज्याचे सामर्थ्य हे फार मोठे असते. याची जाणीव गांधींना असल्यामुळेच त्यांनी निशस्त्र पण शांततेच्या रूपाने ब्रिटीशांचा प्रतिकार केला. स्वातंत्र्यानंतर आणि आजही भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वच देशात गांधींच्या या मार्गाचा अवलंब सुरू आहे. हिच गांधीच्या विचारांची प्रासंगिकता आहे.


संदर्भ ग्रंथ सूची

१) दा.न. शिखरे, "महात्मा गांधी गौरव ग्रंथ".

२) आमटे बाबा, 'गांधी एक युगमुद्रा'.

३) प्रधान, ग.प्र. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत', साधना प्रकाशन.

४) 'Indian Express' Dt. 4/3/2019 P.1

५) Wikipedia, Forest Act. 2006.


❖❖❖

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-IX, Issue-II
April - June - 2019
Marathi

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

2018 - 19

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>**प्रा. डॉ. इंद्रजीत ओरके**<br>**वैशाली धनविजय** | १-६ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसंख्या नियंत्रक विषयक विचार<br>**प्रा. डॉ. प्रदिप एच. गजभिये** | ७-१० |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता<br>**कु. हेमलता आनंदराव उराडे** | ११-१५ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मराठी दलित कथा<br>**डॉ. शरद देवराव उमाटे** | १६-२१ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखेर हिन्दू धर्म त्यागला !<br>**प्रा. एम. यु. टिपले** | २२-२६ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व्यवस्थापन विचार<br>**Prof. Pravin P. Raut** | २७-३३ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य एक रोमांचकारी इतिहास<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी भोयर** | ३४-३८ |
| ८ | चवदार तळे सत्याग्रह : १९२७<br>**डॉ. धर्मेंद्र तेलगोटे** | ३९-४१ |
| ९ | महाडचा धर्मसंगर : क्रांतीचा आरंभ<br>**डॉ. विलास आत्माराम देऊळकर** | ४२-४५ |
| १० | डॉ. बी. आर. आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय व मानवतावादी दृष्टीकोन<br>**डॉ. विजयकुमार महादेव गवई** | ४६-५१ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>**प्रा. सतिश आर. झाधव** | ५२-५७ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातीसंस्थेचे निर्मुलन<br>**प्रा. डॉ. सुरेश मोतीराम डोहणे** | ५८-४१ |

VOLUME - IX, ISSUE - II – APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ८. चवदार तळे सत्याग्रह : १९२७

डॉ. धर्मेंद्र तेलगोटे
प्राचार्य, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता प्रस्थापित करण्याच्या ज्या चळवळी केल्या त्यात 1927 मध्ये महाड येथ केलेला चवदार तळे सत्याग्रह हा महत्त्वपूर्ण आहे. या सत्याग्रहाच्या माध्यमातून बाबासाहेब स्पृश्य व अस्पृश्य यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करत होते. हिंदू समाजाच्या पुनर्रचनेचा त्यांचा जो विचार होता त्याची ही सुरूवात होती. त्यामुळे चवदार तळे सत्याग्रहास असाधारण महत्त्व आहे तथापि या समतेच्या सत्याग्रहास सनातनी हिंदू, सुधारक, सत्यशोधक व कॉंग्रेसच्या नेतृत्वाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. तरीही आंबेडकरांनी आपले प्रयत्न पुढे चालूच ठेवले. या सत्याग्रहामुळे निराश न होता त्यांनी मंदिर प्रवेश सत्याग्रहाची चळवळ 1930 नंतर चालविली.

**प्रास्ताविक**

1927 च्या चवदार तळे सत्याग्रह हा आंबेडकरांच्या समता प्रस्थापनेचा पहिला प्रयत्न होता. या सत्याग्रहाच्या बाबतीत सनातनी, सुधाकर, सरकार व कॉंग्रेस पक्ष यांची काय भूमिका होती यांचे विवेचन करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे.

**चवदार तळे सत्याग्रह (1927)**

हिंदू समाजातील अस्पृश्य समाजाला सार्वजनिक स्वरूपातील पाणी स्पृश्यांच्या बरोबरीने पिण्याचा हक्क नव्हता. त्यांचा स्पर्शच निशिध्द मानला गेला होता ते ज्या ज्या वस्तुंना स्पर्श करतील ती ती वस्तू शुध्द करून घेतली जात असे. 4 ऑगस्ट 1923 रोजी रावसाहेब सि.के. बोले यांनी मुंबई विधीमंडळात एक ठराव मांडला. "अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये, न्यायालय या सार्वजनिक ठिकाणी मुक्तव्दार असावे" असा तो ठराव होता. हा ठराव अमलात आणण्यासाठी मुंबई सरकारने सर्व जिल्हाधिकारी, नगरपालिका, जिल्हा मंडळे व मुंबई महापालिकेचे अधिकारी त्यांच्यासाठी एक परिपत्रक काढले या परिपत्रकाच्या मार्फत श्री बोले यांच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचा हुकूम काढला. पण या ठरावाची अंमलबजावणी करण्याची मानसिकता अधिकाऱ्यांमध्ये आढळली नाही. त्यामुळे श्री. बोले यांनी 5 ऑगस्ट 1926 रोजी या संदर्भात दुसरा ठराव मांडला. 'नगर पालिका, लोकल बोर्ड, जिल्हा बोर्ड यांनी या संदर्भातील ठरावाची अंमलबावणी न केल्यास त्यांना सरकारतर्फे देण्यात येणारे वार्षिक अनुदान बंद करण्यात येईल." असा तो ठराव होता. हा ठराव पास झाला. महाड नगरपरिषदेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. सुरबानाना चिटणीस यांनी या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला. त्यांच्याच पुढाकाराने 5 जानेवारी 1924 रोजी महाड नगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केले. पण प्रत्यक्ष भीतीपोटी कोणताही अस्पृश्य तळ्यास स्पर्श करण्यास तयार नव्हता.

20 मार्च 1927 रोजी महाड येथे कुलाबा जिल्हा 'बहिष्कृत परिषद' भरली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. परिषदेला साडेतीन हजार लोक श्रोते होते. नानासाहेब टिपणीस, बापूसाहेब सहस्त्रबुध्दे, अनंतराव चित्रे, बापुराव जोशी, तुळाराम भाई, श्री. शंकरभाई धारिया यासारखी सवर्ण मंडळी हजर होती. हिंदू महासभा, गांधीवादी, प्रगतीशिल व्यापारी यांच्याशी संबंधित ही मंडळी होती. या परिषदेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी श्री. अनंतराव चित्रे यांनी "आपल्या महाड नगर परिषदेने 1924 मध्ये चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केले आहे. तेव्हा तो ठराव आपण अमलात आणू या" असा प्रस्ताव मांडला. श्री. चित्रे यांच्या प्रस्तावाप्रमाणे परिषदेतील सर्व सभासद दोन–दोन व्यक्तीच्या रांगेने तलावाकडे गेले. याचे नेतृत्व डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यांनी तिथे जाऊन चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले. सत्याग्रहातील ही मंडळी महात्मा गांधी व शिव छत्रपती महाराज यांच्या नावाचा जयघोष करत होती. या प्रकारची माहिती महाड गावास समजली. अस्पृश्यांनी चवदार तळ्यास स्पर्श केला आहे, आता ते गावाच्या मंदिरात जाणार आहेत. अशी अफवा पसरविण्यात आली. तेव्हा परिषदेहून परत जाणाऱ्या लोकांवर हल्ला करण्यात आला. जे अस्पृश्य जेवण करत होते, त्यांच्या जेवणात माती कालविण्यात आली. काही सत्याग्रही जेव्हा डॉ. आंबेडकरांकडे जाऊन प्रतिहल्ला करण्याची परवानगी मागू लागले तेव्हा डॉ. आंबेडकरांनी त्यास नकार दिला. याप्रसंगी सर्वांनी संयम पाळावा असे आवाहन डॉ. आंबेडकरांनी त्यांना केले.

**सत्याग्रह विश्लेषन व निष्कर्ष**

चवदार तळे सत्याग्रह सरकारने पास केलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होता. या सत्याग्रहाच्या माध्यमातून हिंदू समाजातील स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात समानता प्रस्थापित करण्यासाठीचा तो डॉ. आंबेडकरांचा प्रयत्न होता.

महाड येथील चवदार तळे सार्वजनिक तळे होते. सरकारच्या निधीतून त्यांची निर्मिती झाली होती. त्यामुळे या तळ्याचा लाभ समाजातील सर्वांना घेता यावा या उद्देशाने रावसाहेब सि.के. बोले यांचा ठराव विधानसभेने मान्य केला होता. पण ठराव मान्य झाल्यावरही मुंबई प्रांतातील स्थानिक स्वराज्य संस्था या ठरावाची अंमलबजावणी करत नव्हत्या. त्यामुळे ज्या संस्था या ठरावाची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांचे सरकारी अनुदान बंद केले जाईल. असा दुसरा ठराव रावसाहेब सि.के. बोले यांच्याच पुढाकाराने असेम्ब्लीने मान्य केला. तेव्हा महाड नगरपरिषदेने चवदार तळे सर्वासाठी खुले केले. तथापि या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नव्हती. या पार्श्वभुमीवर आंबेडकर सरकारच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाड येथे गेलेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व करत होते.


अस्पृश्यांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन करणे ही बाब स्पृशांना न पटणे स्वाभाविक होती. खर तर समानतेच्या चळवळीतील ही घटना एक मैलाचा दगड होती. महाराष्ट्रातील सुधारक, सत्यशोधक चळवळीतील लोक व महाराष्ट्र कॉंग्रेसच्या नेत्यांना यात सहभागी होऊन पाठिंबा देता आला असता किंवा सत्याग्रह झाल्यावर स्पृश्यांनी अस्पृश्यांवर जो भ्याड हल्ला केला त्याचा निषेध करता आला असता. बहुसंख्यांक हिंदू बुरसटलेल्या मतांचे असले तरी त्यांच्यातील सुधारणावादी म्हणविणारा महाराष्ट्रात सुशिक्षितांचा फार मोठा वर्ग होता. तो वर्ग सुध्दा आंबेडकरांच्या समर्थनार्थ पुढे आला नाही किंवा या घटनेचा निषेध करण्यासाठी पुढे सरसावला नाही. याला फक्त जेधे–जवळकर या सत्यशोधक पुढाऱ्यांचा अपवाद होता. त्यांनीही केवळ महाड शहरातील मराठ्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला.

काळाराम तळे सत्याग्रहाचा परिणाम असा झाला की, या निमित्ताने सर्वसामान्य स्पृश्य समाज आपल्या विरोधात किती आहे याची जाणीव अस्पृश्यांना झाली. या समाजातील जे सुधारणावादी, सुधारक, सर्वधर्मसम ही त्यांच्या मनात अस्पृश्यांसाठी किती जागा आहे, याचा प्रत्यय आला. ते अल्पसंख्यांक असले तरी जर ते या समता विचारांच्या पाठिशी तेव्हा (1930) उभे राहिले असते तर समाज सुधारणेच्याबाबतीत आपण कितीतरी पुढे गेलो असतो.

काळाराम तळे प्रकरणामुळे बाबासाहेब त्यांच्या समता प्रस्थापनेच्या किंवा हिंदू धर्म सुधारणेच्या प्रयत्नापासून दूर गेले नाहीत. पण आपल्या प्रामाणिक प्रयत्नाकडे पाहण्यासाठी हिंदू समाज सहानुभूतीने पाहण्यास तयार नाही, याची जाणीव आंबेडकरांना झाली हिंदू समाजातील सुधारणा किंवा त्या समाजाचे समतेच्या पायावरील पुर्नगठन कोणत्या पद्धतीने करावे? असा प्रश्न त्यांना पडला. दुराग्रही सनातनी व तथाकथित सुधारणावादी यांच्या पद्धतीने हे काम पुढे जाऊ शकत नाही, असे त्यांना वाटायला लागले. तथापि त्यांची तशी खात्री झाली नव्हती. म्हणून त्यांनी 1930 नंतर मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे नेतृत्व केले किंवा अशा सत्याग्रहांना पाठिंबा दिला.

संदर्भ :

1. धनंजय किर, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर", पाप्युलर प्रकाशन, 1989.
2. महाराष्ट्र शासन : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18, भाग–1.
3. शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, ठोकळ प्रकाशन – 1961.
4. महाराष्ट्र शासन : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, 2008.



Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL
AJANTA
2018-19
Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I
IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com
Ajanta Prakashan
Digital
Wallet
PAY

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृ |
|---|---|---|
| २७ | ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आरोग्य शिक्षण<br>**प्रा. एस. बी. चोरडीया** | १२ |
| २८ | दलित साहित्याचे मराठी साहित्यातील योगदान<br>**प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे** | १२९ |
| २९ | संसदीय लोकशाही यशासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार<br>**प्रा. व्ही. आर. ढेंगळे** | १३४- |
| ३० | उच्च शिक्षणामध्ये मराठी भाषेचे शैक्षणिक मूल्य : अनमोल<br>**प्रा. डॉ. अपर्णा अ. पाटील** | १३७-१ |
| ३१ | निसर्गसौंदर्य टिपत जीवनभाष्य करणारा नीलकृष्ण देशपांडे यांचा कविता संग्रह : दिंडी<br>**प्रा. अभय सुभाष जोशी** | १४१-१४ |
| ३२ | वर्तमान युगातील शारीरिक शिक्षण व फिटनेसचा कल<br>**प्रा. डॉ. पंकज अशोकराव ठाकरे** | १४६-१४ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २८. दलित साहित्याचे मराठी साहित्यातील योगदान

**प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे**
मराठी विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

कोणतेही साहित्य निर्माण होणे ही त्या युगाची, काळाची आणि स्वास कोंडलेल्या माणसांच्या व्यक्त होणाऱ्या अभिव्यक्तीची गरज आणि स्वाभाविक प्रतिक्रिया असते. या पार्श्वभूमीवर दलित साहित्याने एका वेगळया विश्वाची आणि प्रस्थापित साहित्याने न घेतलेल्या अनुभवांची विद्रोहक आणि नवनिर्माणक पेरणी मराठी साहित्यामध्ये केली. खरं तर जेव्हा मराठी साहित्याने या माणसांच्या माणूसपणाला नाकारले, त्यांच्या अस्तित्वाला झिडकारले तेव्हा त्यांनी मराठी साहित्याला समांतर पण स्वतंत्र्य अशी साहित्य नगरी अस्तित्वात आणली. त्या साहित्य विश्वाचे नाव होते दलित साहित्य. दलित साहित्य हे युगायुगापासून नाकारलेल्या वंचितांचे, शोषितांचे आणि दळल्या भरडल्या गेलेल्या सर्वहारा घटकाचे असले तरी संहारापेक्षा संरक्षण आणि नकारापेक्षा नवसंस्कृतीचे पुनर्भरण हेच या साहित्याचे ध्येय राहिले आहे. ''काळा हिरवा निळा असे रंग वाटून घ्यायचे नसतात कारण या रंगातूनही इंद्रधनुष्य साकारता येते'' ही मानव्याची सांगड घालण्याचे काम या साहित्याने केले. ही माणसांना सांधणारी विचारधारा या साहित्याची प्रेरणा होती जी वस्तूस्थितीमध्ये मराठी साहित्य पार विसरले होते. मराठी साहित्य हे बहुजनांचे नसून ते केवळ अभिजनांची मक्तेदारी झाले होते. अषा पार्श्वभूमीवर सर्वांना सामावून घेणारे आणि मानव्याचा उद्घोष करणारे साहित्य मराठी साहित्यात दाखल झाले. हा मराठी साहित्यात केवळ वरवरचा बदल नव्हता तर संपूर्ण मराठी साहित्यच ढवळून निघणारा सांस्कृतिक बदल होतो. त्यामुळे मराठी साहित्याचा विचाराचा परिघ विस्तारला. अशा दलित साहित्याच्या विविध अंगाची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

युगायुगाची चिरवेदना, दुःख, दारिद्रया जीवनाला आलेले बकालपण यांना वेशीवर टांगणारे युगपुरूष भारतीय संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दलित साहित्याचे उद्‌गाते मानले जाते. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवता आणि जातिधर्माविहीन समाज या मूल्यांची मांडणी करणाऱ्या बुद्धाचा हा देश आहे. ''युद्ध नको बुद्ध हवा'' हे मूल्य जगणाऱ्यांचे हे शतक आहे. भगवान बुद्धाने खडतर तपश्चर्या करून मानवाच्या कल्याणाचा मार्ग शोधला. त्याचेच धम्मदान आपल्या मुलांसह जगाला दिले. सम्राट अशोकाला ही वाट गवसली तेव्हा त्याने शस्त्र टाकून बुद्धविचारांची पेरणी केली. कबीर, शाहू, फुले यांसारख्या सुधारकांचा मार्गही तोच होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर जातीविषमतेवर मात करण्यासाठी लाखो शोशित पिडित दलितांना बुद्धाचा मानवी कल्याणाचा सन्मार्ग दिला. आधुनिक काळात दलितांच्या सांस्कृतिक इतिहासाचा प्रारंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक जीवनातील आगमनाने झाला आणि दलितांच्या उद्धार करणाऱ्या दलित चळवळीचा पाया रचला गेला. दलित संकल्पनेचा प्रारंभ अथवा प्रथम स्वीकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय लेखनातून झालेला असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रात हा शब्द उपयोजिल्याने दलित साहित्य संकल्पना त्यातून उदयास आलेली दिसते.

मूकनायक, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत यातून वैचारिक चळवळीचे बीजारोपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांची अस्मिता आत्मभान जागृती केली.

1960 च्या दरम्यान भारतीय दलित साहित्याचा केंद्रबिंदूच मुळात तळागाळातील माणूस आला. नकार आणि मानवी मूल्यांच्या मुक्तीचा जाहिरनामा जोपासणारे दगडी रेषेचे साहित्य म्हणून दलित साहित्य आले. दलित साहित्य म्हणजे केवळ आर्थिक, सामाजिक लढा नसून तो सांस्कृतिक नीतीमूल्यांचा लढा आहे. साहित्य कोण्या एका जातीचे, कोण्या एका धर्माचे साहित्य नाही तर वर्णव्यवस्थेने ज्यांचे मनुष्यत्व नाकारले अशा जनतेचे साहित्य झाले. कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, कविता इ. वाङमय प्रकार दलित साहित्याने ... दलित साहित्याचा हा नवा प्रवाह ही एक तत्कालिन घटना नाही तर मानव्यत्वाची प्रतिश्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य ... मानणाऱ्या एका विराट आंदोनलातून जन्मलेले आहे आणि ते मानवी इतिहास मानवाने निर्माण केलेल्या व्यवस्थेचे, धर्मव्यवस्थेचे मूल्यमापन करू इच्छित आहे. दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य नव्हे ... माणुसकीसाठी लढणाऱ्यांचे साहित्य आहे. आपण दलित आहोत हे निर्भयपण स्वीकारणाऱ्यांचे. पण आता माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्रस्थपित करू पाहणाऱ्यांचे ते साहित्य आहे. दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून ... आलेले साहित्य आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या दलितांच्या मुक्तीसंग्रामात दलित साहित्याचा जन्म झाला. ... साहित्य हे आंतर जीवनातील ताणतणाव घेउन आले. त्यामुळे त्याचे वेगळेपण मान्यच करावे लागते. दलित साहित्य चळवळ ही सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे.

दलित साहित्याचे प्रस्फुटन प्रामुख्याने सर्वप्रथम कवितेमधून झाले. कारण युगायुगाची वेदना व्यक्त करण्यासाठी कवितेसारखे दुसरे माध्यम नव्हते. दलित कवितेतून दलितांच्या दुखद जीवनाचा मोठा पट अभिव्यक्त झाला आहे. आपल्या हक्कांच्या लढयासाठी. अन्यायाच्या प्रतिकारासाठी स्व–अस्तित्वाची जाणिव या कवितेतून प्रकट झाली. संत प्रभावातील चोखोबांनी व्यवस्थेविरूदध उदवेग मांडला परंतु बंड उभे केले नाही. कर्ममेळा बंडखोरीची भूमिका घेतांना ईश्वराच्या अस्तित्वालाच प्रश्नचिन्ह निर्माण करतो. महात्मा फुले आपल्या काव्यात सामाजिक न्यायाची तरफदारी करतांना समतेच्या प्रस्थापनेसाठी पाखंडीपणावर घाव घालतात. किसान फागू बनसोडे, वामनदादा कर्डक यांनी अस्पृश्यतेविरूदध लढयाचे शस्त्र उगारले. नव्या व उदयाच्या जगातील प्रकाशमान सूर्याचे सोबती होण्यासाठी दलित कवींनी उजेडाची गीते गायली. दलित कवींच्या पहिल्या पिढीतील नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, वामन निंबाळकर, प्रा.केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, दया पवार, भीमराव देठे, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे यांनी समृद्ध व स्फोटक कविता लिहिली. लोकनाथ यशवंत, डॉ.षनणकुमार लिंबाळे, प्रज्ञा बनसोड, भगवान ठाकूर, प्रा.सुशमा अंधारे यांनी यासाठी लढयाचे तत्वज्ञान मांडले. नामदेव ढसाळांसारख्यांनी माणसाचे शोषण थांबावे, समता सर्वदूर पसरावी यासाठी सर्वांनी प्रयत्न केले.

बाबुराव बागूल समाजाची विषमतेवर आधिरति चौकट नाकारण्यासाठी निषेदनामा आपल्या कवितेतून नोंदवितात,

**"ज्यांनी केली चूक इथे जन्म घेण्याची**
**त्यांनीच ती सुधारली पाहिजे**

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

**देश सोडून अथवा भीषण युद्ध करून"**

माणसांना जन्मजात कुरूपपणा देणाऱ्या जाती जातीत विभाजन करणाऱ्या इथल्या व्यवस्थेवर आसडू उगारतात. तर अण्णाभाउ साठे डॉ.आंबेडकरांची प्रेरणा स्वीकारून म्हणतात,

**"जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव"**

पँथरच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवितांना डॉ.आंबेडकरांप्रती कृतज्ञता यावर ज.वि.पवार व्यक्त करताना म्हणतात,

**"तू झालास परिस्थितीवर स्वार आणि घडविलास नवा इतिहास**
**तू झाला मूक समाजाचा नायक आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत"**

समाजाचा आटत चाललेला प्रवाह कवीला अस्वस्थ करतो. वामन निंबाळकर यांनी गावकुसाबाहेरच्या चिरडलेल्या जीवनावर प्रस्थापितांनी एकही शब्द उच्चारू नये यावर आपली प्रतिक्रिया नोंदविली आहे. लोकनाथ यशवंत, अरूण काळे, प्रज्ञा लोखंडे, सागर जाधव, शशीकांत हिंगोणेकर, अशोक इंगळे यांनी दलित कवितेला नवा चेहरा दिला आहे.

दलित कथेच्या आरंभस्थळी ना.रा.शेंडे, बंधू माधव यांच्या कथेने वास्तवदर्शी विषय रेखाटताना शोषण झालेली व परिस्थितीला शरण गेलेली माणसे उभी करताना त्यांच्यातील व्यवस्थेविरूद्ध लढा साकारला. बंधू माधव यांची कथा माणसांच्या तुडवल्या गेलेल्या अस्तित्वावर फुंकर घालते. प्रस्थापित व्यवस्थेला नकार व विद्रोहाची प्रखरता घेऊन बाबुराव बागुलांची कथा दलित कथेच्याच नव्हे तर एकूणच मराठी कथेच्या संदर्भात मैलाचा दगड ठरावी अशी आहे. 'जेव्हा मी जात चोरली होती', 'मरण स्वस्त होत आहे' हे त्यांचे कथासंग्रह. डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असे क्रांतीसन्मुख विचार बागुलांनी व्यक्त केले. व्यवस्थेने चारही बाजूंनी नाकेबंदी केलेल्या माणसांचे लक्षवेधी व जीवंत चित्रण केले. झोपडपट्टी, चिखलातील दलदलित राहणाऱ्या माणसांच्या जगण्यातील भयावह भीषणता बाबूराव बागुल मांडतात.

केशव मेश्राम, योगीराज वाघमारे, वामन होवळ हे महत्वाचे लेखक. केशव मेश्राम यांचे 'हकीकत आणि जटायू', 'पत्रावळ', 'खरवड' या कथासंग्रहातून अज्ञान, दारिद्रय आणि परंपरा यातून सुटका व्हावी म्हणून धडपडणारा माणूस एका करारी विद्रोहाने पेटून उठलेला माणूस त्यांच्या कथेचा गाभा आहे. वामन होवाळांनी माणसांच्या जगण्यातील विसंगती हेरली. 'येळकोट', 'वाटा–आडवाटा' यातून नवशिक्षित समाज व रूढी परंपरेत फसलेला समाज यातील विसंगती नाट्यात्मकपणे सादर केली. योगिराज वाघमारे यांनी दलितांना स्थित्यंतराच्या ज्या चक्रातून जावे लागले त्याची नोंद घेउन कथा लिहिली. अविनाष डोळस, योगेंद्र मेश्राम, सुखराम हिवराळे, अर्जुन डांगळे, सुधाकर गायकवाड, माधव कोंडविलकर, रविचंद्र हडसनकर, उत्तम कांबळे, जगदिश कदम, एकनाथ सोनवणे इ.लेखकांनी दलित कथा समृद्ध केली.

दलित साहित्याला कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वप्न तसे फार उशिरा पडले. त्यामुळे आपले अनुभव कादंबरीतून त्यांनी साहित्य प्रांतात थोडे स्थिर स्थावर झाल्यावर व्यक्त केले. दलित लेखकांनी कादंबरी या प्रकारातून आपल्या व्यथा–वेदना रेखाटण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले. परंतु अण्णाभाउ साठे यांनी ज्या तागदीने व व्यापक प्रमाणात कादंबरी हा वाङ्मय प्रकार समृद्ध केला तेवढा प्रयत्न दिलत वाङ्मय प्रवाहात झाला नाही. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात दलितेत्तर लेखकांनी दलित जीवनाचे चित्रण केले. विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या कादंबरीत

चित्रण केले आहे. तर अण्णाभऊ साठे, शंकरराव अस्पृष्य व गुन्हेगार अशा मांग–गारूडी समाजाचे चित्रण केले आहे. तर अण्णाभऊ साठे, शंकरराव खरात, बागुल, ना.रा.शेंडे, हरिभाऊ पगारे, हि.रा.बनसोडे नागदेव वटकर, ज.वि.पवार, केशव मेश्राम, नामदेव कांबळे या व इतर नवोदित लेखकांनी दलित जीवनाचा वास्तवपणे वेध घेतला. शंकरराव खरातांनी कादं परंतु कथेतून ज्या जाणिवा त्यांनी प्रखरपणे उजागर केल्या तेवढ्या कादंबरीतून नाही. बाबुराव बागुल 'अघोरी' या दलित साहित्यात महत्वाची नोंद झालेल्या कादंबऱ्या. 'सूड' मध्ये स्त्रीत्वाचे शोषण जगण्याचा अधिकार व मानवतावादाचे यथार्थ दर्शन घडते. 'अघोरी' मधून अंधश्रद्धेला हात घातला. ना.रा. कादंबरीतून आदिवासी समाजाचे भीषण प्रश्न, त्यांचे जगणे व आदिवासींच्या उत्थानासंदर्भातील नोंदी या कादंबरीतून व्यक्त केले. श्रुंगारातले प्रेम 'काजळी रात्र', 'विलासिनी', 'अशंजा', 'गायत्री' या त्यांच्या हरिभाऊ पगारे यांची युगप्रवर्तक हि.मो.बनसोड यांनी दलित मुक्ततेचा विषय घेऊन लिहिले 'मुक्तीसंग्राम', 'आभाळाऐवढे' या कादंबरीतून महार व मांग या गावगाड्यात दबलेल्या जातींनी स्वाभीमानाने जगण्याचा करतात. नागदेव वटकर यांची अपराधी 'सोळा शिणगार' या कादंबरीतून शोषित व उपेक्षितांच्या जीवनाचे केले. ज.वि.पवार 'बलिदान' या कादंबरीतून गटबाजीमुळे उद्‌धस्त झालेल्या दिलतांच्या प्रश्नाचं विवेचन करण्यात आंबेडकरांच्या नंतर दलित समाजातली 'हकिगत', 'जटायू व पोखरण' यात दलित जीवनाचा मोठा आलेख मांडतात. नामदेव ढसाळ यांची 'हाडकी', 'हाडवळ' यात दलित स्त्रीच्या शोषणाचे भिषण चित्रण ते रेखाटतात. कांबळे यांची श्राद्‌ध यातून दिलतांमध्ये पेटलेला अंतर्गत कलह ते मांडतात शरणकुमार लिंबाळे यांची 'उपऱ्या' व 'हिंदू' या 1970 नंतर आलेल्या महत्वाच्या कादंबऱ्या अण्णाभाऊ साठे यांनी दलित कादंबरीला प्रभावी मांडले व आपल्या प्रतिभेने मराठी दलित कादंबरीचे दालन समृद्‌ध केले.

कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्रे इत्यादीच्या माध्यमातून जीवनानुभव व्यक्त व्हायला लागला. या संदर्भात शाहिरी हा वाङ्‌मय प्रकार समाजप्रबोधनासाठी जास्त प्रभावशाली ठरला. शाहिरी वाङ्‌मयाच्या रूपाने नवलेखकांसाठी एक नवे दालन खुले झालं. शाहिरांनीही बाबासाहेबांचे विचार काव्यबद्‌ध केले. त्यांचे जीवन शिक्षण समाजकार्य इ. विवेचन शाहिरीतून व्हायला लागले आणि रंगमंचीय कार्यक्रम असल्यामुळे सर्व लोक त्यांचा थेट आस्वाद घ्यायला लागलेत. वाचिक साहित्याचा सर्वसामान्यांवर जास्तच प्रभाव पडला. पारंपारिक शाहिरी वाङ्‌मयात अनेक दलित शाहिर होऊन गेले. शाहीर ज्यामध्ये मराठीतील आद्य वगनाटयकार उमाबाबू मांग हा होय. 'मोहना बटाव' ही उमा बाबू या दलित शाहिरांची अमर कलाकृती आहे. यातील तात्या हा उमाजीचा मुलगा होता. ही सातू–हिरू यांतील हिरू हा हिरूजी कांबळे नावाचा महार तमासगीर होता. सातू सुबराव हे मांग जातीचे शाहीर. सातू–हिरू यांचे समकालीन आहेत. याच काळात रावू मांग हा शाहीर कवलापुरात होऊन गेला. पुढे सातूजीची मुलं शिव–संभा हे शाहीर आपल्या शाहिरीने प्रसिद्‌धी पावले होते. पुढं भाऊ फक्कड हा शाहीर त्यांचे सोबत शाहिरी करू लागला.

मराठी शाहिरी वाङ्‌मरातील प्रसिद्‌ध शाहीर पठ्ठे बापूराव यांचा समकालीन असणारा अर्जून बाधोलीकर हा एक दिलत शाहिर आहे. अपप्रवृत्तीवर त्याने भेदक मारा केला आहे. पुढे बापूरावांच्याच फडात नाच्याचे काम करणारे हरिभाऊ वडगावकर हे शाहीर. हे 'गाढवाच लग्न' या वगनाटयामुळे महाराष्ट्रभर प्रसिद्‌ध आहेत. पुढे भाऊ–बापू नारायणगावकर यांना 'चंद्रमोहन' या वग नाटयामुळे 1961 चे राष्ट्रपतीपदकही मिळाले. भाऊ फक्कड यांचेवर बाबासाहेबांच्या चळवळीचा फार मोठा प्रभाव होता. किसन कुसगावकर इ. शाहिरांनी शाहिरी वाङ्‌मयाला पुढे रेटत